विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| कार्यकारी संपादक | : | श्री. मोहन पाठक |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००२ |
| वर्ष | : | दुसरे |
| अंक | : | ९ |
| पृष्ठे | : | ३६ पृष्ठे |


**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ६०**

MAHMAR/ 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ



# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष दुसरे / अंक ९ / ऑगस्ट २००१

## संपादकीय

## विषय तेच, चर्चा ही त्याच

एखाद्या विषयावर चर्चा करणे आणि फक्त चर्चाच करीत राहणे ही आज आमची मानसिकता आहे. पंधरा ऑगस्ट हा राष्ट्रीय सण, गणेश चतुर्थीचा लोकप्रिय उत्सव, फटाके वाजविण्याची सवय इ. काही विषय उदाहरणादाखल लक्षात घेता येतील. कित्येक वर्षे कालमानानुसार गणेशोत्सवांचे स्वरुप बदलायला हवे का, गणपतीचे विसर्जन कसे करावे, गणपती समोर म्हटल्या जाणाऱ्या आरत्या अशा एक ना दोन हजारो विषयांवर हौशी आणि सराइतही सतत तेच तेच लिहितात. गणेश विशेषांकांचा ढीग बाजारात येतो आणि पुरोगामी व्हायला पाहिजे खरे, असे म्हणत आम्ही जागच्या जागीच उभे राहतो.

असं म्हणतात की विचार आणि विचारच (फक्त) करणारी माणसं कालांतराने कृतिशून्य होतात. गणेशोत्सवांचे स्वरुप बदलायला पाहिजे याचा जप करीत राहाणारांनी प्रत्यक्ष गणेशोत्सवाचे स्वरुप बदलायला स्वत:पासून सुरुवात करायला हवी. प्रदूषणाचे परिणाम या विषयावर फक्त बोलत राहण्यापेक्षा व तेच तेच विचार लिहीत राहण्यापेक्षा स्वत:पासून सुरुवात करायला हवी. तरच मांजराच्या गळ्यात घंटा बांधण्याचं अवघड काम प्रत्येक गहन प्रश्नाच्या क्षेत्रात केले जाईल. शिवाजी जन्माला यावा, पण शेजारच्या घरात माझ्या नको..... अशा स्वभावाची माणसे काहीच करीत नाहीत.

वृत्तपत्रे, नियतकालिके यांच्या वितरण विभागांना बाजार मूल्य लक्षात घेताना, लोकांच्या मागणीचा विचार करावा लागतो व जो उठतो तो याचं चर्वितचरण करून संपलेला विषय चघळत राहतो.

बदलणे जर गरजेचे असेल तर बदलायलाच हवे. नाही त्या ठिकाणी धार्मिकतेचे अवडंबर का माजवायचे ? आजचे गणेशोत्सव वेगळ्या पद्धतीने होण्याची गरज आहे. मुक्त गणेशोत्सवांची संख्या मर्यादित करून 'एक गाव एक गणपती' होऊ शकेल का ? या कडेही लक्ष द्यायला पाहिजे. अन्यथा वर्षोनु वर्षे तेच ते करीत रहाणे यात सर्व प्रकारचा अपव्यय होईल. गणेश चतुर्थी प्रमाणेच अनेक विषयांचा आपण थांबून आढावा घ्यायला हवा. या विषयांच्या कालक्रमानुसार बदलेल्या परिमाणांचा, बदलू शकणाऱ्या परिमाणांचा अभ्यास व्हायला हवा.

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष दुसरे / अंक ९ / ऑगस्ट २००२

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : ५४२ ६२ ७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : ५३४ १२ ९१
५४१ ३५ ४६

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | एक गाव, एक संगणक | श्री. अनिल शाळिग्राम | ३ |
| २) | '' दैनंदिन कामकाज आणि वृत्ती '' | श्रीमती वेदवती हब्बु | १२ |
| ३) | श्रीमद्‌भगवत् गीता<br>॥ संन्यासयोगः ॥ ( अध्याय ५ वा ) | सौ. आशा भिडे | १६ |
| ४) | व्यंकटेश माडगूळकर<br>(एक अष्टपैलू व्यक्तिमत्व) | अरुणा विचारे | २२ |
| ५) | एकविसाव्या शतकात मराठीचे स्थान | श्री. प्रभाकर अरदकर | २५ |
| ६) | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ | कुलगुरु डॉ. वी. पी. सावळे | २८ |
| ८) | परिसर वार्ता | प्रा. मोहन पाठक | ३२ |
| ९) | खरचं सांगतो, ती वाचन-उत्सुक<br>गोड मुलं आहेत ! | प्रा. प्रदीप कर्णिक | मलपृष्ठ<br>३,४ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# एक गाव, एक संगणक

'एक गाव, एक संगणक' हा अभिनव प्रकल्प ग्रामीण भागाला वरदानच ठरणार आहे. या प्रकल्पाची माहिती सदर लेखात आहे. - संपादक

'एक गाव, एक संगणक' प्रकल्पाचा उद्देश हा आहे की महाराष्ट्राच्या ग्रामीण मागास विभागात माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करायचा. ही माहिती केंद्रे माहिती, संपर्क, शिक्षण, जनसेवा केंद्रे व्हावीत अशी कल्पना आहे. या केंद्रांचे संचालन स्थानिक युवक-युवती करतील. त्यात लोकांचा पूर्ण सहभाग असेल. ही सर्व माहिती मराठीत असणार आहे. तसेच या माहितीवर स्थानिक लोकांचे नियंत्रण असणार आहे. त्याचा उपयोग देखील तेच करणार आहेत. अशी केंद्रे एकमेकांशी संपर्क ठेवतील, माहितीची देवाण-घेवाण करतील आणि एकमेकांना मदत करतील.

या योजनेत माहिती, ज्ञान यांना प्राधान्य दिले जाईल. कार्यकर्त्यांना माहिती तंत्रज्ञानात आवश्यक प्रशिक्षण देण्यात येईल. अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात मानवी ज्ञान भांडवल तयार करण्याला प्राधान्य दिले असेल. तर भांडवली गुंतवणूक, संगणक, हार्डवेअर वगैरेला दुय्यम महत्त्व देण्यात येईल. त्यामुळे स्थानिक पातळीवर काम सुरु करण्याची इच्छा असणाऱ्या कार्यकर्त्यांच्या एखाद्या गटाला नगण्य गुंतवणुकीच्या आधारे काम सुरु करता येईल. योजनेच्या उत्स्फूर्त वाढीसाठी हे आवश्यकच आहे. त्यानंतर जशी प्रगती होईल तशी संसाधने वाढवत जाता येईल.

योजनेची आखणी करताना आधुनिक अर्थशास्त्राचा, विशेषतः आंतरिक वाढीच्या सिद्धांताचा आधार घेण्यात आला आहे. त्याचप्रमाणे मागास देशांसाठी म्हणून ओळखली जाणारी सिम्प्युटर (सोपा कॉम्प्युटर), टेलिफोनचे ''वायरलेस लूप'' चे भारतीय शास्त्रज्ञांनी तयार केलेले तंत्रज्ञान, भारतीय भाषांसाठीचे 'आकृती' बहुभाषीय सॉफ्टवेअर, अशा प्रकारच्या सुयोग्य तंत्रज्ञानाचे आम्ही स्वागत करतो.

एखाद्या ठिकाणी सुरुवातीचे काम काय असेल? लोकांना उपयुक्त माहिती गोळा करणे आणि त्या विभागातील बहुसंख्य जनतेला प्रकल्पाभोवती गोळा करणे. हे करताना महाराष्ट्रातील विविध ठिकाणच्या स्थानिक परिस्थितींचा, वैशिष्ट्यांचा आणि गरजांचा विचार करावा लागेल. त्याचप्रमाणे प्रकल्प स्वतःच्या पायावर उभा करणे आणि त्यात स्थानिक तरुण-तरुणींना थोड्या प्रमाणात का होईना रोजगार उपलब्ध होणे महत्त्वाचे आहे. पुढील टप्प्यांमध्ये स्थानिक नैसर्गिक संसाधने आणि स्थानिक मानवी संसाधने यांचा डेटाबेस (माहिती) गोळा करण्यात येईल. अशा प्रकारची माहिती स्थानिक आर्थिक विकासासाठी उपयुक्त ठरू शकते.

स्थानिक तरुणाईला सुरुवातीच्या टप्प्यातच माहिती तंत्रज्ञानाची ओळख झालेली असेल. त्यांच्या पुढील विकासासाठी त्यांना विविध प्रकारची संगणकीय शैक्षणिक साधने पुरवता येतील. अत्युच्च पातळीवर स्थानिक परिस्थितींना अनुरुप नवनिर्माणे व्हावीत असे अपेक्षित आहे. अशी नवनिर्माणे मागास स्थितींसाठी सुयोग्य असतील. नवनिर्माणे केवळ तांत्रिक स्वरूपाची नसून आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय क्षेत्रातील असू शकतील.

विकास असा नसावा की ज्यामुळे लोकांचा केवळ वरकरणी फायदा व्हावा, तर खऱ्या अर्थाने लोकांचे सक्षमीकरण होऊन त्यांची ताकद तयार व्हावी. अनेक वेळा लोकांना तात्पुरते फायदे मिळालेले असतात, पण प्रत्यक्षात ते एकूण परिस्थितीत प्रभावहीन, निष्क्रिय, बिनमहत्त्वाचे ठरलेले असतात. जर लोक स्वतःच्या प्रयत्नांनी आणि खऱ्या अर्थाने माहितीसक्षम झालेले असतील, तर असे कार्यकर्ते त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या स्थानिक माहितीच्या साठ्यांची संगतवार मांडणी करू शकतील, त्यातून योग्य निष्कर्ष काढू शकतील आणि जेव्हा आवश्यक वाटेल तेव्हा त्या आधारे जन आंदोलन उभारू शकतील. एक गाव, एक संगणक योजनेची एकूण आखणीच अशी असणार आहे की प्रश्नांना व्यक्तिगत, व्यक्तिवादी पद्धतींनी सामोरे न जाता सामूहिक उत्तरे शोधली जावीत.

या योजनेत मुद्दामच जाणीवपूर्वक तपशील भरलेले नाहीत. एक गाव, एक संगणक योजना पेटीबद्ध नाही, तर चहूबाजूंनी उमलणारी, मुक्तपणे वाढणारी आहे. अनेकदा असे आढळून येते की चांगले स्थानिक प्रयोग देखील तेथेच अडकून पडतात, काळाच्या ओघात मागे पडतात. माहिती तंत्रज्ञान, त्यावर आधारित विकासाचे शस्त्र लोकांच्या हाती पडले तर असे अनेक बहुमोल प्रयोग संगणकबद्ध करता येतील. त्यांचे सर्वत्र वेगाने, कमी खर्चात प्रक्षेपण करता येईल.

अशा प्रकारे आपण आजच्या घडीचे अत्याधुनिक तंत्रज्ञान अत्यंत मागासलेल्या परिस्थितींसाठी वापरणार आहोत. हा प्रकल्प अनेक वर्षे कार्यरत असलेल्या जनसंघटनांकडेच आपण घेऊन जाणार आहोत. याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे अशा जनआंदोलनांना आणि त्यातील कार्यकर्त्यांना जी सामाजिक जबाबदारीची भावना असते, भारतातील मागास स्थितीच्या प्रश्नांबद्दल जी समज असते ती अतिशय मोलाची आहे. याशिवाय स्थानिक पातळीवर तरुणाईचे नवे गट देखील ही योजना राबवू शकतील. थोडक्यात कार्यकर्त्यांना माहिती तंत्रज्ञानातील क्षमतांची आणि ते कसे हाताळावे या विषयीची योग्य माहिती पुरवली, विश्लेषणाच्या आधुनिक वैज्ञानिक पद्धतींची ओळख करून दिली आणि मागास स्थितीमध्ये खरा विकास कसा करावा त्याचा मार्ग दाखवला तर आजच्या एकूण परिस्थितीवर मोठे परिणाम घडवणे अशक्य नाही.

**योजनेचे नेमके स्वरुप:**

या योजनेनुसार ग्रामीण भागात माहिती केंद्रे उभारण्यात येतील. ही माहिती केंद्रे मागासलेल्या भागासाठी माहिती, संपर्क, शिक्षण, समाजसेवेची केंद्रे म्हणून काम करतील.

या केंद्राचे संचालन तेथील १०वी, १२ वी, ग्रॅज्युएट झालेली मुलेच करतील. माहिती गोळा करण्यात आणि माहितीचा उपभोग घेण्यात सर्व गावकऱ्यांचा सहभाग असेल.

या केंद्रामध्ये त्या त्या विभागास अनुरुप आणि स्थानिक जनतेला उपयुक्त ठरतील असे नैसर्गिक साधनसंपत्तीचे, तसेच मानवी साधनसंपत्तीचे डेटाबेस तयार केले जातील. या सर्व माहितीवर तेथील जनतेचा हक्क असणार आहे.

थोडक्यात स्थानिक जनतेला माहिती सक्षम होता येईल, एकमेकांशी संपर्क ठेवता येईल आणि शैक्षणिक साधने उपलब्ध करून घेता येतील. याचा उपयोग स्थानिक परिस्थितीनुसार नवनिर्माणासाठी होईल. ही नवनिर्माण केवळ तंत्रज्ञानात्मकच नसून सामाजिक, राजकीय आर्थिक देखील असू शकतील.

अशा प्रकारे आजच्या घडीचे जागतिक पातळीवरील सर्वात आघाडीचे तंत्रज्ञान सुयोग्य पद्धतीने

ग्रामीण भागात वापरले तर सध्याच्या चौकटीत जनतेचे तातडीचे प्रश्न सोडवण्यासाठी तसेच समाज परिवर्तनासाठी पूरक ठरू शकेल.

'एक गाव, एक संगणक' च्या मॉडेलमध्ये पुढील गोष्टींचा विचार केला आहे.

१. एखाद्या ठिकाणी ही योजना राबवायची असल्यास भांडवली गुंतवणुकीची पूर्वअट मानलेली नाही. कारण अशी पूर्वअट ठेवल्यास ही योजना सार्वत्रिक होऊ शकणार नाही. अर्थात साधने चळवळीच्या ओघात उभारली जाऊ शकतात.

२. हार्डवेअर, सॉफ्टवेअरपेक्षा मानवी संसाधने, कार्यकर्ते, लोकांचा सहभाग, प्रशिक्षण या गोष्टी जास्त महत्त्वाच्या आहेत.

३. स्थानिक पातळीवर केंद्र सुरु करताना लोकांच्या तातडीच्या गरजांच्या आधारावर पुढे जावे लागेल.

४. असे सहानुभूतीदार तयार केले जातील जे कॉम्प्युटर टाईम, इंटरनेट टाईमची मदत देऊ करतील.

**एक गाव, एक संगणक प्रकल्पाचे आजवरचे प्रयोग :**

**१. शेतमजूरांचा डेटाबेस :**

सन २००० मध्ये **कुमार शिराळकर** यांच्या नेतृत्वाखाली नंदुरबार जिल्ह्यातील तळोद्याजवळ 'मोड' या गावी पहिला प्रयोग करुन बघण्यात आला. सुरुवातीला शिराळकरांनी संगणकाचा वापर कार्यकर्त्यांच्या डेटाबेससाठी करायला घेतला. त्याचा शेतमजूर चळवळीला फायदा ही झाला.

पण जेव्हा शेतमजूरांच्या माहितीचा डेटाबेस करायला घेतला तेव्हा वेगळा अनुभव येऊ लागला. शेतमजूरांच्या डेटाबेसमध्ये नाव, गाव, पत्ता, वय, किमान वेतन, स्वतःची जमीन आहे का ? स्वतःचे घर आहे का ? अतिक्रमित जागेत घर बांधले आहे का ? घरपट्टी किती ? पिण्याचे पाणी कोठून भरता ? रेशनकार्ड आहे का ? दारिद्र्य रेषेचे कार्ड आहे का ? वृद्ध असल्यास पेन्शन किती ? निराधार असल्यास (स्त्रियांच्या बाबतीत) अनुदान मिळते का ? खाजगी कर्जाचा किती ? सरकारी योजनांतील आजवर मिळालेल्या अनुदानाची रक्कम ? आजार कोणते आहेत ? शिक्षण किती ? रोजगारासाठी केलेल्या स्थलांतराचे वार्षिक दिवस ? ऊस तोडणीसाठी कोणत्या कारखान्यावर जाणार ? वगैरे सर्व तपशील ॲक्सेस प्रोग्रॅममध्ये टाकण्यात आला. अशा प्रकारे एकूण तीन हजार शेतमजूरांचा डेटाबेस तयार करण्यात आला.

यातून फिल्टर करून रिपोर्ट तयार केल्यावर पेन्शन न मिळालेल्या वृद्ध शेतकऱ्यांचा प्रश्न, अनुदान न मिळालेल्या निराधार स्त्रियांचा प्रश्न, बेघरांचा प्रश्न, पिण्याच्या पाण्याची सोय नसलेल्या वस्त्यांची यादी वगैरे प्रश्नांची नेमकी आकडेवारी अधिकाऱ्यांपुढे ठेवता आली. तशी आकडेवारी सरकारकडे सुद्धा नसल्याने आंदोलनाला धार चढली.

आदिवासी भागातील टी. बी. पेशंटस्‌ची यादी नाव, गावा सकट तयार करून अधिकाऱ्यांपुढे ठेवता आली. तेवढ्या औषधांचा पुरवठा गावातून करण्यास भाग पाडले. या व्यतिरिक्त डोळ्यांचे आजार, ॲमिबियॉसिस, कातड्याचे रोग, गलगंड, ॲमिबिया, स्त्रियांचे आजार वगैरे प्रश्नांची तपशीलवार माहिती तयार करता आली. या आजारांसाठी खाजगी डॉक्टरांचे कॅम्प आयोजित करण्यात आले.

**२. ऊस तोडणी, वाहतूक कामगारांचा डेटाबेस :**

दुसरा प्रयोग परभणी येथे **राजन क्षीरसागर** यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आला. हा डेटाबेस ऊस

तोडणी, वाहतूक कामगारांचा होता. या डेटाबेसमध्ये दहा हजार ऊस तोडणी, वाहतूक कामगारांची माहिती नोंदवण्यात आली. यामुळे चळवळीला जो फायदा झाला त्याने उत्साहित होऊन १६ जिल्ह्यातील दहा लाख ऊस तोडणी, वाहतूक कामगारांपैकी एक लाख कामगारांचा डेटाबेस तयार करण्याचे काम सध्या चालू आहे.

सध्या साखर उद्योगापुढे फार मोठे संकट उभे राहिले आहे. ऑस्ट्रेलिया आणि जर्मनीतून ऊस तोडणीसाठी अजस्त्र राक्षसी २०० मशीन्स आणली जात आहेत. त्यामुळे हे दहा लाख कामगार बेकारीच्या खाईत लोटले जाणार आहेत. साखर धंद्यावर देखील विपरित परिणाम होऊन लाखो शेतकरी देशोधडीला लागणार आहेत. साखर कारखाने बंद पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे ऊस तोडणीची यंत्रे मागे घ्या अशी पहिली मागणी आहे. दुसरे म्हणजे ऊस तोडणी, वाहतूक कामगारांना सध्या कोणतेही संरक्षण नाही. त्यासाठी माथाडी बोर्ड नेमावा अशी दुसरी मागणी आहे. हे बहुसंख्य कामगार वर्षाकाठी अनेक महिने स्थलांतर करून कामाला जातात. त्यांना त्या त्या ठिकाणी रेशनची व्यवस्था व्हावी ही तिसरी महत्त्वाची मागणी आहे. दरवर्षी सुमारे आठहजार कामगार अपघातात सापडतात असा एक अंदाज आहे. ऊस तोडणी, वाहतूक कामगारांना होणारे हे अपघात बहुतांशी जीवघेणे असतात.पण त्यांना कोणतीही नुकसान भरपाई देण्यात येत नाही. तशी ती मिळावी ही चौथी मागणी आहे.

या सर्व मागण्या धसास लावण्यासाठी तसेच आंदोलन पुढे नेण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा, डेटाबेसचा उपयोग केला जाणार आहे. तसेच या सर्व कामासाठी मराठी ई-मेलचा उपयोग केला जाणार आहे.

**३.परभणीतील ऊस उत्पादकांचा प्रश्न :**

आधुनिक तंत्रज्ञानाचा आणि डेटाबेसचा चळवळीसाठी कसा उपयोग होऊ शकतो त्याचे एक चांगले उदाहरण येथे द्यावेसे वाटते. परभणी जिल्ह्यात दोन वर्षांपूर्वी साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात ऊस लावण्यास उद्युक्त केले. शेतकऱ्यांनी त्याप्रमाणे ऊसाचे क्षेत्र वाढवले देखील. पण कारखान्यांनी आपले आश्वासन पाळले नाही आणि त्यामुळे बराचसा ऊस पडून राहिला. परभणीतील ऊस तोड, वाहतूक संघटनेने त्याविरुद्ध आवाज उठवून शेवटी सरकारला विमानातून आधुनिक पद्धतीने एरिअल सर्व्हे करावयास भाग पाडले. परिणामी शेतकऱ्यांना आठ कोटी रुपयांची भरपाई मिळू शकली.

चळवळीचे नेतृत्व आधुनिक तंत्रज्ञानाच्या बाबतीत सजग असेल तर काय घडू शकते त्याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे.

**४. नवी मुंबईतील प्रयोग :**

६ जानेवारी २००२ रोजी या केंद्राचे उद्घाटन झाले. नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील ४१ गावे, तसेच पनवेल, पेण, उरण वगैरे तालुक्यांतील लगतची सुमारे ४० गावे मिळून सुमारे ८० गावांसाठी ही योजना राबवली जाणार आहे.

**कृष्णा खोपकर** यांच्या नेतृत्वाखाली हे काम चालणार असून त्याचे केंद्र आहे बेलापूर जवळ आग्रोळी गावी स्थित असलेले कॉ. बी. टी. रणदिवे ग्रंथालय. उद्घाटनाच्या वेळी १३ जिल्ह्यातील ३२ विभागातील किसान, शेतमजूर, महिला, विद्यार्थी, युवक प्रतिनिधी हजर होते.

या माहिती केंद्रात झेरॉक्स, फॅक्स, डी. टी. पी., ई-मेल वगैरे तांत्रिक गोष्टींची सोय, ती देखील मराठीत उपलब्ध आहे. या व्यतिरिक्त इतर अनेक महत्वाच्या माहिती सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

महापालिका, सिडको, राज्य सरकार यांच्याशी संबंधित विविध खाती, तसेच वीज परिवहन, शिक्षण,

आरोग्य, न्यायालये यांच्याशी निगडित लोकांच्या असंख्य गरजा आणि कामे असतात. या कामांसाठी कोरे अर्ज उपलब्ध करून देण्यापासून, ते अर्ज योग्य प्रकारे भरणे, त्या कामाच्या पूर्ततेसाठी योग्य ती पुढील कार्यवाही करणे अशा प्रत्येक ठिकाणी सर्वसामान्य लोक अडून बसतात. मग त्यांची नाडवणूक केली जाते. अशा सर्व ठिकाणी हे माहिती केंद्र लोकांच्या मदतीला धावून जाऊ शकेल.

ग्रामीण आणि अर्धशहरी भागांशी निगडित अनेक प्रश्न आहेतच. पण नवी मुंबईच्या वाढतीतले काही खास आणि ठळक प्रश्न म्हणजे साडेबारा टक्के भूखंडाचा प्रश्न, जमिनींशी निगडीत अनेक प्रश्न, मिठागरांचे प्रश्न, सिडको प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न, रोजगार आणि स्वयंरोजगाराचे प्रश्न वगैरे. आणखी एक महत्त्वाची माहिती म्हणजे तरुणांसाठी 'पब्लिक सर्व्हिस कमिशन' च्या राज्य आणि केंद्रस्तरीय परीक्षांसाठी मार्गदर्शनाची सोय.

अशा प्रकारचे माहिती केंद्र बनवण्याचा उद्देश सामान्य जनतेच्या दैनंदिन गरजांपासून, प्रश्नांपासून सुरुवात करून त्यांना माहिती समृद्ध (information rich) बनवणे, स्वतःच्या पायावर उभे करणे आणि त्यांच्यातील नैसर्गिक नेतृत्व पुढे आणणे हे असणार आहे.

**५. राज्यव्यापी संगणक प्रशिक्षण शिबिर :**

दिनांक २७ एप्रिलपासून ३० एप्रिलपर्यंत चार दिवस नवी मुंबईतील आग्रोळी गावी एक वेगळेच दृश्य दिसत होते. तेथील कॉ. बी. टी. रणदिवे स्मारक ग्रंथालयामध्ये महाराष्ट्रातील विविध संघटनांमध्ये काम करणारे सत्तर कार्यकर्ते दिवसरात्र संगणकांना अक्षरशः चिकटून बसले होते. त्यांची तहान भूक हरपली होती. एक नवेच साधन त्यांच्या हाती पडले होते. आणि ते मुळातून जाणून घेण्याची, हस्तगत करण्याची त्यांची तीव्र इच्छा, धडपड जाणवत होती.

ही कार्यशाळा थोडी वेगळी होती. त्यासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारण्यात आले नव्हतेच, उलट काही कार्यकर्त्यांच्या प्रवास खर्चाचा भार देखील उचलण्यात आला होता. पण अपेक्षित हे होते की त्यांनी आपापल्या मिळणाऱ्या ज्ञानाचा उपयोग व्यक्तिगत न करता आपापल्या जनसंघटनांसाठी, व्यापक जनसमुदायासाठी करावा. यामध्ये किसान सभा, शेतमजूर संघटना, वाहतूक कामगार, महिला जनवादी संघटना, विद्यार्थी, युवक यांचा समावेश होता. ते महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, बुलढाणा, यवतमाळ, परभणी, बीड, जळगाव, नंदुरबार, धुळे, नाशिक, पुणे, ठाणे, रायगड, नवी मुंबई, मुंबईचे प्रतिनिधित्व करीत होते.

ही केवळ सुरुवात आहे. आग्रोळी स्थित असलेले हे राज्यस्तरीय माहिती केंद्र यापुढे महाराष्ट्रातील सर्व सामाजिक कार्यकर्त्यांसाठी माहिती तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणारे कायमस्वरुपी केंद्र म्हणून काम करील. त्याचप्रमाणे महाराष्ट्राच्या अंतरभागात देखील अशा प्रकारची प्रशिक्षण उपकेंद्रे स्थापन केली जातील, जेथे स्थानिक कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षणाची आणि मार्गदर्शनाची सोय असणार आहे. यातून महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात जनतेत काम करणारे, माहिती तंत्रज्ञानाचे परिपूर्ण ज्ञान असलेले शेकडो नव्हे, तर हजारो कार्यकर्ते तयार व्हावेत असे अपेक्षित आहे.

चार दिवसांच्या या शिबिरात वर्ड प्रोसेसरपासून ऑडिओ, व्हिडिओ प्रेझेंटेशनपर्यंत अनेक विषयांची ओळख करून देण्यात आली. संगणकात मराठी टाईप कसे करावे, चित्रांचे, फोटोंचे स्कॅनिंग कसे करावे, टाईपसेटिंग करून प्रिंटआऊट कसे घ्यावेत, स्प्रेडशीट सॉफ्टवेअरमध्ये विविध प्रकारची माहिती कशी भरावी आणि त्या माहितीचे फिल्टर्स, सॉर्टिंगचा वापर करून विश्लेषण कसे करावे, गावाचे, चळवळीचे ऑडिओ, व्हिडिओ प्रेझेंटेशन कसे करावे, ई-मेल कसा करावे, आपला स्वतःचा ई-मेल पत्ता नेटवर कसा नोंदवावा हे सर्व विषय हाताळण्यात आले.

सुमारे दहा संगणकांची सोय करण्यात आली होती आणि त्यावर गटा-गटांनी कार्यकर्ते काम करीत होते. प्रत्येक कार्यकर्त्याने या प्रत्येक विषयाची हाताळणी स्वतः करण्यावर भर दिला होता. यापैकी बहुसंख्य कार्यकर्ते प्रथमच संगणकाचा वापर करीत होते. त्यामुळे त्यांना हा वेगळाच अनुभव होता. अनेकांना संगणकाविषयी भिती होती ती मोडली गेली. चार दिवसात त्यांना माहिती तंत्रज्ञानाच्या अनेक विषयांची ओळख तर झालीच. शिवाय शिबिर संपवून ते आपापल्या गावी परतले तेव्हा प्रत्येकाचा ई-मेल पत्ता निश्चित झाला होता.

शिबीरातील चर्चेत एक महत्त्वाचा धागा सातत्याने होता. तो म्हणजे चळवळीतील माहितीचे महत्त्व आणि माहितीच्या हाताळणीसाठी माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग कसा करावा ? जनतेच्या जिव्हाळ्याचे विविध प्रश्न घेताना शास्त्रीय पद्धतीने माहिती कशी गोळा करावी, ती संगणकात कशी साठवावी, त्या माहितीचा प्रत्यक्ष कामात विविध प्रकारे कसा उपयोग करावा यावर विस्ताराने विचार करण्यात आला.

शिबीरात महिला कार्यकर्त्यांचा सहभाग मोठा आणि लक्षणीय होता. आतापर्यंत कष्टकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानापासून वंचित ठेवले गेले आहे, त्याहीपेक्षा स्त्रियांना जास्तच ठेवले गेले आहे. विज्ञान, तंत्रज्ञान हे त्यांचे क्षेत्र नाही असे त्यांना सातत्याने सांगितले गेले आहे. आपल्याकडे स्त्रियांनी नांगर धरू नये असा दंडक मानला गेला आहे. समान कामासाठी पुरुषांपेक्षा कमी वेतन जगात आजही सर्वत्र, अगदी पुढारलेल्या देशातही दिले जाते. शिबीरात सुमारे पंधरा महिला कार्यकर्त्या होत्या आणि शिकताना त्यांनी दाखवलेली चिकाटी वाखाणण्यासारखी होती. महिलांच्या प्रश्नांवर माहिती गोळा करायची, त्याचप्रमाणे अशाच प्रकारचे खास शिबिर ग्रामीण महिला कार्यकर्त्यांसाठी भरवायचे निर्णय त्यांनी घेतले.

रुपरेषा आणि आतापर्यंत आपण प्रकल्पाची करण्यात आलेले प्रत्यक्ष प्रयोग यांचा आढावा घेतला. प्रकल्पाच्या संकल्पनेच्या उभारणीत माहिती तंत्रज्ञानाच्या काही महत्त्वपूर्ण गोष्टींचा विचार करण्यात आला आहे तो संक्षेपाने समजून घेणे आवश्यक ठरेल.

**माहिती तंत्रज्ञानातील काही मर्मस्थळे :**

पुढील गोष्टींमुळे माहिती तंत्रज्ञान वैशिष्ट्यपूर्ण आणि महत्त्वाचे ठरते

१) माहिती तंत्रज्ञानाचा कल नेहमी स्वस्त होत जाण्याचा आणि सरतेशेवटी नगण्य किमतीला उपलब्ध होण्याचा असतो.

२) माहिती तंत्रज्ञान हे असे तंत्रज्ञान आहे की जे सर्वसामान्यांच्या, अगदी तळागाळातल्यांच्या हातात पडू शकते. यापूर्वीची महत्त्वपूर्ण तंत्रज्ञाने कधी सामान्य लोकांच्या हाती पडू शकत नव्हती, तर त्यातून निर्मित उत्पादनेच लोकांच्या हाती पडू शकत होती.

३) माहिती तंत्रज्ञानामुळे जगातील ज्ञानाची कवाडे सर्वसामान्यांसाठी खुली होण्याची शक्यता निर्माण होते.

या तीन गोष्टींमुळे ज्ञान, तंत्रज्ञानाच्या बाबतीत सर्वसामान्य जनतेचे, मागासलेल्यांचे सक्षमीकरण होण्याची शक्यता निर्माण होते. म्हणजे हे आपोआप घडेल असे नाही. तर हे घडण्यासाठी आता परिस्थितीमध्ये आवश्यक अट (necessary condition) उपलब्ध झाली आहे जी पूर्वी नव्हती. अर्थात परिस्थितीत पुरेशी अट (sufficient condition) उपलब्ध नसते. तिच्या पूर्ततेसाठी 'योग्य' प्रयत्न करावे लागतात. माहिती तंत्रज्ञान मागास देशात रुजवताना येथील परिस्थितीनुरुप सुयोग्य रचना तयार करणे हा या प्रयत्नाचा एक भाग असतो. तसे न करता आहेत तशीच मॉडेल्स वापरली तर ते देशाला हानिकारक ठरू शकते.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे एखाद्या देशाचा आर्थिक विकास नेमका कोणत्या कारणाने होतो. हा प्रश्न पॉल रोमर यांनी १९८६ साली मांडलेल्या ''आंतरिक वाढीच्या सिद्धांतामुळे'' सुटला. त्याआधी अर्थशास्त्र सांगत होते की आर्थिक वाढीसाठी श्रम आणि भांडवल हे दोन घटक प्रामुख्याने कारणीभूत आहेत. त्या मॉडेलप्रमाणे आंतरराष्ट्रीय व्यापाराने आर्थिक विकास घडणे शक्य होते.

''आंतरिक वाढीच्या सिद्धांतामुळे'' स्पष्ट झाले आहे की श्रम आणि भांडवलाच्या जोडीला मानवी ज्ञानभांडवल आणि ज्ञान, तंत्रज्ञान हे घटक देखील एखाद्या देशाच्या आर्थिक वाढीला कारणीभूत असतात. त्यातून लक्षात आले की केवळ आंतरराष्ट्रीय व्यापारातून आर्थिक विकास घडणार नाही तर ज्या देशाकडे ज्ञान, तंत्रज्ञान, मानवी ज्ञानभांडवल यांचा साठा जास्त असेल त्या देशाचा आर्थिक विकास होईल.

आंतरिक वाढीच्या सिद्धांताचा आणखी विकास केला आणि विशेषत: तो मागास स्थितींना लावण्याचा प्रयत्न केला तर बऱ्याच गोष्टी संभवतात. उदा. कामगारांचा नवनिर्मितीसाठी उपयोग, तो देखील सामुदायिक पातळीवर करण्याची मॉडेल्स तयार करणे शक्य आहे. त्याचप्रमाणे मागास देशांनी भरमसाठ भांडवलाचा मार्ग टाळून आपल्याकडील मानवी ज्ञानभांडवल वाढवणे आणि त्याचा सुयोग्य पद्धतीने वापर करणे असे पर्यायी विकास कार्यक्रम आखणे शक्य आहे. रोमरच्या मते प्रत्येक देशाने विकासाची बागडोर स्वत:च्या हाती घेतली पाहिजे. तरच त्या देशाला ज्ञानयुगात आपले अस्तित्व टिकवता येईल. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या जागतिकीकरणाच्या सापळ्यापासून स्वत:ला वाचवता येईल.

बड्या कॉर्पोरेशन्स, विविध प्रभावगट, राज्यकर्ते यांनी आधुनिक काळात आपले वर्चस्व टिकवण्यासाठी एक खास पद्धती कौशल्याने विकसित केली आहे. ती थोडक्यात सांगायची तर जनसामान्यांना स्वत:च्या भवितव्याचे निर्णय घेण्यापासून वंचित ठेवायचे, लोकांचा सार्वजनिक सहभागच विविध पद्धतींनी सीमित करून टाकायचा, लोकांच्या विचारांवरच नियंत्रण प्रस्थापित करायचे. उत्पादन, व्यापार, वितरण, विचार, सामाजिक धोरणे, विदेशी धोरणे वगैरे सर्व बाबतीतल्या महत्त्वाच्या गोष्टींमधील निर्णयांच्या बाबतीत लोकांचा हस्तक्षेप शक्यतो मर्यादित ठेवायचा आणि हे सर्व निर्णय केंद्रात सत्तेतून घ्यायचे. थोडक्यात सर्वसामान्यांना त्यांच्या नकळत प्रभावहीन (marginalise) करून टाकायचे. हे करण्याचा एक मार्ग म्हणजे समाजाला व्यक्ती-व्यक्तींमध्ये विभागातून प्रत्येक व्यक्तीला एकूण परिस्थितीपुढे हतबल करणे. दुसरा मार्ग म्हणजे समाजाला माहिती वंचित ठेवणे. अशा प्रकारे समाजाचे वैचारिक नि:शस्त्रिकरण करून टाकायचे. यामुळे अनेकदा विकासासाठी चळवळी फसलेल्या दिसतात. सकृतदर्शनी त्या समुदायांचा विकास झाल्या सारखा वाटतो. प्रत्यक्षात तो समुदाय एकूण परिस्थितीत प्रभावहीन होऊ शकतो.

या सर्वांमध्ये आधुनिक प्रचारमाध्यमांचा कशा प्रकारे उपयोग केला जातो, त्याचप्रमाणे इंटरनेट सारख्या आधुनिक शस्त्रांचा कसा वापर होऊ शकतो त्याची आपण कल्पना करू शकतो. चळवळीने हे सर्व लक्षात घेतले तर हीच शस्त्रे चळवळींची होऊ शकतात. मात्र या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले तर प्रत्यक्ष जन चळवळच प्रभावहीन होण्याचा धोका संभवतो.

अलीकडच्या काळात समुदायांना कशा प्रकारे प्रभावशून्य केले जात आहे त्याची काही उदाहरणे म्हणजे ऊस तोडणीसाठी महाराष्ट्रात आणली जाणारी अजस्त्र विदेशी यंत्रे, नवी मुंबईच्या शहरीकरणाच्या प्रक्रियेत स्थानिक शेतकऱ्यांची झालेली गळचेपी, नर्मदा खोरे प्रकल्पातील शेतकऱ्यांचे स्थलांतर. गेल्या काही वर्षांत सर्व

भारतीय भाषांची जी गळचेपी चालली आहे तो देखील महत्त्वाचा प्रश्न आहे. हल्ली वारंवार जे बँकांचे व्याजदर कमी करण्यात आले आहेत तो मध्यम वर्गाला फार मोठा फटका आहे. वैद्यकीय सेवांच्या बाबतीत जी धोरणे अमलात आणली जात आहेत तो लोकांच्या फार मोठ्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. अशा प्रकारचे स्थानिक पातळीवरील देखील प्रश्न असू शकतात. त्यांचे धागेदोरे उलगडून दाखवणे आणि त्याबद्दलची माहिती लोकापर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे. तरच लोक त्यावर कृती करू शकतील.

एक गाव, एक संगणक प्रकल्प मागास स्थितीविरुद्ध, ग्रामीण जनतेसाठी, व्यापक लोकशाहीसाठी पुढचे पाऊल ठरले तर ते या प्रकल्पाचे यश ठरेल.

**अनिल शाळिग्राम**

anilshaligram@yahoo.com

OOO

## परिशिष्ट
## राज्य पातळीवरील प्रशिक्षण शिबिरासंबंधी

वर उल्लेखलेल्या राज्य व्यापी संगणक प्रशिक्षण शिबिरातील शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वाचे अनुभव पुढे नमूद करीत आहोत.

हे शिबिर २७ एप्रिल ते ३० एप्रिल पर्यंत ४ दिवसांचे होते. महाराष्ट्रातील एकूण १५ जिल्ह्यांतील ७० कार्यकर्त्यांचा त्यात सहभाग होता. शिबिरार्थींची पार्श्वभूमी साधारण पुढीलप्रमाणे होती.

सर्व शिबिरार्थी सामाजिक संघटनांत काम करणारे कार्यकर्ते होते. किसान सभा, शेतमजूर संघटना, ऊस तोडणी, वाहतूक कामगार, महिला जनवादी संघटना, ऊस उत्पादक शेतकरी, विद्यार्थी संघटना, युवक संघटना अशा विविध संघटनांत काम करणारे कार्यकर्ते होते.

शिबिरार्थींना संगणकाची तोंडओळख नव्हती किंवा असलीच तर जुजबी ओळख होती.

जनतेचे प्रश्न, माहिती आणि त्या आधारे प्रत्यक्ष सामाजिक काम करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान समजून घ्यायचे आहे याची स्पष्टता होती.

शिबिरात सुमारे १५ महिला कार्यकर्त्या होत्या आणि एकूण शिबिरार्थींमध्ये विद्यार्थी, युवकांचा भरणा जास्त होता.

शिबिर जरी चार दिवसांचे होते तरी मुख्य प्रशिक्षण ३ दिवसांचे झाले.

**पहिला दिवस :**

पहिल्या दिवशी शिबिरार्थींची साधारण ८ जणांच्या गटांमध्ये विभागणी करण्यात आली. प्रत्येक गटाला एक संगणक देण्यात आला. शिबिराच्या अनुभवातून गटाला एक संगणक देण्यात आला. शिबिराच्या अनुभवातून असे दिसून आले की चार जणांमागे एक संगणक हे प्रमाण जास्त योग्य ठरेल. त्याचप्रमाणे प्रत्येक एक संगणक न देता गटाप्रमाणे संगणक देण्याने सांघिक पद्धतीने झालेले प्रशिक्षण योग्य आहे.

सुरुवातीला संगणक कसा उघडायचा, एखादा प्रोग्रॅम कसा कार्यान्वित करायचा, माऊस आणि की-बोर्ड यांचा वापर यामध्ये अर्धा दिवस दिला गेला. इंग्रजी आणि मराठी टायपिंग करून एखाद्या वर्ड प्रोसेसरमध्ये पेजमेकिंग कसे करावे यामध्ये पहिला दिवस गेला.

पहिल्या दिवशी काम संपल्यावर एकत्रित बैठक घेण्यात आली आणि दिवसभराच्या अनुभवांवर चर्चा करण्यात आली. त्यावेळी असे आढळले की बहुतेकांना

मराठी टायपिंग करणे जड गेले आहे. त्यावर मराठी टायपिंग कसे आत्मसात करावे यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. या चर्चेमुळे उत्साहित होऊन अनेक जण रात्रीच पुन्हा सराव करू लागले. दुसऱ्या दिवशी मराठी टायपिंग सोपे आहे असा बहुतेकांचा अभिप्राय आला.

**दुसरा दिवस :**

दुसऱ्या दिवशी स्प्रेडशीटमध्ये माहिती भरून त्याचे फिल्टरिंग, सॉर्टिंग कसे करावे ते शिकवले गेले. आता सर्व जण हे काम मराठीतच करू लागले. त्यामुळे आता मराठीत टाईप करण्याचा आत्मविश्वास देखील आला आणि माहिती साठवण्याची संगणकीय प्रक्रिया समजल्यामुळे शिबिरार्थी उत्साहाने शिकू लागले. या सर्वांचा सराव चालू असतानाच एक बाजूला इंटरनेट, मराठी ई-मेल यांची ओळख करून देण्याचे काम चालू ठेवण्यात आले. दुपारनंतर प्रत्येकाला आपले नाव, गाव, किमान माहिती स्वतःला मराठीत टाईप करायला लावले आणि त्याचे प्रिंटआऊट काढायला लावले. त्यामुळे प्रिंटआऊटचे देखील प्रशिक्षण झाले.

**तिसरा दिवस :**

पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन शिकवण्यात आले. ते मराठीचा वापर करून तसेच ई-मेलने पाठवण्यास योग्य अशा एच टी एम एल फॉरमॅटमध्ये करायला शिकवले गेले. फोटो स्कॅन करून प्रेझेंटेशनमध्ये टाकण्याचे तंत्र शिकवले गेले. त्याचप्रमाणे वेब कॅमेऱ्याचा वापर करून व्हिडिओ फाईल्स प्रेझेंटेशनमध्ये कशा टाकाव्यात ते शिकवले गेले.

यावर दिवसभरात गटागटांनी पुढील प्रेझेंटेशन तयार केली.

गावातील स्वच्छता मोहिम

गुजराथ मधील दंगली

ग्रामीण भागातील लहान मुलांचा प्रश्न

प्राथमिक शिक्षण

ही प्रेझेंटेशन कितीही ओबड-धोबड असली तरी कार्यकर्त्यांनी स्वतः निवडलेल्या विषयांत आणि स्वतःच्या प्रयत्नांनी केलेली होती हे विशेष. तसेच ती सर्व मराठीत होती.

शिबिराचा उद्देश हा होता की कार्यकर्त्यांना माहिती तंत्रज्ञानातील शक्यतांचा पूर्ण पट ओलांडून दाखवायचा आणि त्याचा त्यांना स्वतःला वापर करायला लावायचा. त्यामुळे शिबिराच्या शेवटी कार्यकर्त्यांना काहीतरी नवे हाती पडल्याचा आत्मविश्वास आल्याचे दिसून आले. आपापल्या विभागता कोणते माहिती गोळा करावी याची चर्चा करीतच ते शिबिरांतून गेले.

OOO

दिशा

नियमित वाचा.

दिशा

- वैचारिक व्यासपीठ

- विचारांना प्रवृत्त करणारे नियतकालीक

# " दैनंदिन कामकाज आणि वृत्ती "

आपले नियत काम प्रामाणिकपणे, पूज्य भावाने केल्यास आयुष्य सुखी व आनंदी होऊ शकते. Workculture वरून देशाची प्रगती ठरते. या संदर्भातील काही विचार असणारा हा लेख. - संपादक

माणसाच्या आयुष्यातील काम ही एक सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. परिसस्पर्शाने ज्याप्रमाणे लोखंडाचे सोने होते, त्याचप्रमाणे अनेक दृष्टींनी अपूर्ण असलेल्या माणसास, कामामुळे पूर्णत्व येते. भगवद्गीतेतील कर्मयोगात श्रीकृष्णाने अर्जुनाला हेच सांगून ह्यापुढील उच्च पातळीचे तत्त्वज्ञान सांगितले, ते सर्वश्रुतच आहे. ते तत्त्वज्ञान म्हणजे "कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन्" म्हणजेच माणसाने कोणत्याही प्रकारच्या फळाची अपेक्षा न करता कर्तव्यबुद्धीने आपले काम करत रहावे. मी अमुक केल्यावर मला एखादी गोष्ट मिळेल किंवा मिळालीच पाहीजे. असा अट्टाहास हाच सर्व अनर्थांचे मूळ ठरतो.

आपल्याला " WORK IS WORSHIP" ही म्हण, किंवा जपानी लोकांची कार्यक्षमता व प्रामाणिकपणा, तसेच भगवान श्रीकृष्णांचे उपदेश व तत्त्वज्ञान हे सर्व काही माहीत असते. परंतु, प्रत्यक्ष व्यवहारात आपण काय करतो? तर हे सर्व सोयिस्करपणे विसरुन सर्वसाधारणपणे खालील उद्गार काढतो. " मी खूप काही केलं, पण त्याचा काहीच फायदा झाला नाही मला !" किंवा " हे काम माझं नाही" अथवा " आज नको, आपण हे उद्या करु या" ह्याच्या जोडीला, बहुतांशी लोक आळशीपणा, चालढकल व वादविवादातही आपला बहुमूल्य वेळ व्यर्थ दवडत असतात. ह्या अशा वृत्तीमुळे व विचारांमुळे आपल्या दैनंदिन कामकाजावर तर परिणाम होतोच, पण त्याचबरोबर आपले मन:स्वास्थ्य बिघडून प्रकृती अस्वास्थ्यालाही आपणच आमंत्रण देतो. यातूनच आपली असंतोषाची मालिका तयार होते, आणि त्यामुळे आजूबाजूचे वातावरणही नकळत बिघडून जाते.

सर्वसामान्यपणे, दैनंदिन कामकाजाचे दोन भाग करता येतील.

१) **कौटुंबिक कामे :** ज्यात स्वत:ची व कुटुंबासाठी करावी लागणारी कामे अंतर्भूत असतात. उदा. बँकेत जाणे, बाजारहाट करणे, स्वयंपाक करणे, मुलाबाळांची कर्तव्ये, साफसफाई इ. कामे बहुदा सर्वच जण आत्मीयतेने करताना आढळतात. तिथेही काही घरं आदर्श ठरतात ती कामातील शिस्त व आत्मीयता यांच्यामुळेच !

२) **सामाजिक / कार्यालीन किंवा व्यावहारिक कामे:** ह्या दुसऱ्या प्रकारात कार्यालयीन कामे समाविष्ट होतात. ह्यात सरकारी कार्यालये, खाजगी कार्यालयातील कर्मचारी, कामगार वर्ग, समाजसेवक, स्वतंत्र व्यावसायिक इ. प्रकार येतात. नोकरदार माणसांना, ते ज्या कार्यालयात काम करतात, त्यातील वेगवेगळ्या वर्गवारीप्रमाणे (विभागानुसार) व आवश्यकता भासल्यास अधिक जबाबदारीची व प्रसंगी दुसऱ्यांचीही कामे करणे जरुरी असते. ज्याप्रमाणे घरात एखादी व्यक्ती आजारी पडल्यास किंवा बाहेरगावी गेल्यास त्यांची कामे आपण करतो, अगदी त्याचप्रमाणे !

परंतु, अशी जाणीव फारच थोड्या लोकांना असते. खाजगी कंपनीमध्ये ही कामे नियमाचे तंतोतंत पालन करुन, कोणतीही सबब न ऐकता दुसऱ्या कर्मचाऱ्यां करवी करुन घेतली जातात. पण, सरकारी कार्यालयांमध्ये मात्र, संघटनांचे पाठबळ असल्यामुळे, अशा प्रसंगी कामे ठप्प होतात. याचे एक कारण म्हणजे, कामाची वर्गवारी व त्यानुसार वेतन ठरवले जात असल्यामुळे सर्वसाधारणपणे कर्मचारी वर्ग अधिक काम केल्यास, अधिक वेतन अपेक्षित धरतो.

बहुतांशी सरकारी कार्यालयांमध्ये आपले अधिकार व हक्क ह्यांसाठी भांडणारे संघटनांचे नेते व त्याचसाठी जागरूक कर्मचारी वर्ग आढळतो. परंतु, आपले कर्तव्य मात्र तो सोयिस्करपणे विसरून गेलेला आढळतो. "माझ्या वेतन श्रेणीला न्याय देण्याइतपत तरी काम मी दिवसभरात करतो का ?" असे आत्मपरीक्षण करण्याची वेळ कित्येक सरकारी, निमसरकारी कार्यालयांमध्ये आलेली आहे. उशीरा येणाऱ्यांना दंड करणे, रजांची संख्या मर्यादित करणे, दैनंदिन कामाच्या नोंदी ठेवणे, कामातील चालढकलीबाबत समज देणे, व त्यावर देखरेख करणे, नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे, नवीन तंत्रज्ञान शिकण्यास व अमलात आणण्याचे प्रयत्न करणे हे आजच्या प्रचंड प्रगतीच्या व माहिती तंत्रज्ञानाच्या युगात अत्यंत गरजेचे ठरू लागले आहे. सार्वजनिक सुट्ट्या, भरपगारी रजा, नैमित्तिक रजा यांच्या व्यतिरिक्त घरगुती अडचणींचा पाढा वाचून वेळोवेळी सवलती घेऊन पळणे हे तर अगदी सर्रास चालू असते. त्याला आळा हा घातला गेलाच पाहिजे. पगार वाढावा म्हणून हिरहिरीने झगडून वाढीव पगार, बोनस, प्रवास भत्ते, वैद्यकीय सवलती पदरात पाडून घेतल्या जातात. पण या गोष्टींबरोबरच आपले कामही आपण प्रामाणिकपणे व संपूर्ण वेळ केले पाहिजे, अशी जाणीव किती जणांना असते ?

कार्यालयात येताना वेळेवर न येणे, परंतु, घरी जाताना मात्र वेळेच्या आधीच निघणे, चहाच्या आणि जेवणाच्या वेळा ह्या आपल्या सोयीनुसार व हव्या तेवढा वेळ घेऊन, शिवाय, ह्या वेळा म्हणजे आपला हक्कच आहे अशा बेमुर्वत वृत्तीने वागणारे कर्मचारी आजकाल खूपच आढळतात! अशा वृत्तीनेच कार्यालयीन गुणवत्ता ढासळते. याचा परिणाम म्हणून जे प्रामाणिकपणे वेळेवर येतात-जातात, कामं करतात त्यांच्यातही 'आपणच का म्हणून प्रामाणिक रहायचे ?' ही वृत्ती वळावू लागते, किंवा प्रामाणिकपणा हा दुर्गुण असून आपल्यावर अन्याय होत अशी असंतोषाची व वैफल्याची जाणीव फोफावू लागते. अर्थात, कार्यक्षम व न्यायप्रिय तसेच शिस्तप्रिय अधिकारी वर्ग हा असंतोष सहज दूर करु शकतो, परंतु, त्यासाठी अधिकारी वर्गाची सतर्कता, आधी केले मग सांगितले ही वृत्ती असायला हवी.

अधिकाऱ्यांबाबत इतर कर्मचाऱ्यांमध्ये मात्र आदरयुक्त जरब असायला पाहिजे. बेजाबदार अधिकारी, अधिकाऱ्यांची पडखाऊ वृत्ती, एका कर्मचाऱ्याविरुद्ध दुसऱ्या कर्मचाऱ्याजवळ बोलणे किंवा लावालावी करणारे अधिकारी हे कार्यालयामध्ये अराजक माजवण्यास कारणीभूत ठरतात.

प्रोफेशनल म्हणजेच व्यावसायिक कामकाज व कारकुनी कामकाज असेही कामाचे प्रकार पडतात. डॉक्टर, इंजिनिअर, ग्रंथपाल, निरनिराळे व्यापारी व उद्योजक हे व्यावसायिक या गटात मोडतात. हे व्यावसायिक आपले काम उच्च दर्जाचे ठरावे म्हणून त्यात अधिकाधिक सुधारणा करून आपल्या उद्योगाची वा कामकाजाची प्रत राखत असतात. त्यांना व्यावसायिक प्रशिक्षण दिलेले असते. तिथे हे काम माझे नाही, अमूक वेळच मी काम करेन अशा गोष्टींना स्थान नसते. कामात जेवढी आत्मीयता आणि नवीन नवीन तंत्रांचे ज्ञान घेतले जाईल, तितके ते काम जास्तीत जास्त दर्जेदार होत जाईल. आजच्या या जाहिरातींच्या व स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी कामाचा दर्जा सांभाळणे हे अत्यंत महत्त्वाचे ठरते. इथे, एक गोष्ट मुद्दाम नमूद करावीशी वाटते की कामाचा दर्जा हा व्यावसायिक काम असेल तरच वाढतो, अन्यथा नाही हे चुकीचे आहे. इथे माणसाची वृत्ती महत्त्वाची ठरते. एखादा कर्मचारी कारकून असेल किंवा हमाल असेल वा सफाई कामगार असेल. परंतु, आपले काम हेच आपले सर्वस्व, हीच आपली पूजा अशा वृत्तीने करीत असेल तर ते काम अत्यंत उत्कृष्ट दर्जाचे होते. त्या कामाच्या ठिकाणी गेल्यावर मन आपोआपच प्रसन्न होते. अशी माणसेही आज समाजात खूपच आहेत. एका प्रतिष्ठित

संस्थेत एक सफाई कामगार संडास धुण्याचे काम इतक्या तन्मयतेने करी की ते संडासाचे भांडे सुद्धा ती व्यक्ती स्वच्छ पुसून काढी. तसेच, दुसरा एक कर्मचारी बढती नाही की पगार वाढही फारशी नाही हे माहीत असूनही इतके प्रामाणिक व जीव तोडून आपले काम करी की विचारू नये, आणि आपण या व्यक्तीसाठी काहीच करू शकत नाही ह्याची खंत वाटावी. याविरुद्ध काही संस्थेत, व्यावसायिक म्हणवणारे कर्मचारी मात्र आपली पगारवाढ, प्रवास सवलती, वैद्यकिय सवलती मिळवण्याबाबत सतत गर्क असतात. कामाच्या वेळेत एकमेकांबद्दल द्वेषभावनेने बोलत वेळ घालवणे, एकमेकांना खाली खेचण्याचे प्रयत्न करणे, अधिकारी वर्गाच्या चुकांवर किंवा त्यांच्या येण्या-जाण्याच्या वेळांवर (स्वत: वेळेवर न येता) लक्ष ठेवणे, त्यांना दुरुत्तरे करून, त्यांचा अपमान करून ते आपले रोजचे काम मात्र विसरून गेलेले किंवा टाळत असलेले दिसून येते, कोणाबद्दलही जराशी कृतज्ञता न बाळगणे, कर्तव्याचा विसर पडणे हे दुर्गुण स्वत:बरोबरच संस्थेलाही अधोगतीस नेतात.

या संदर्भात एका पुस्तकातील खालील उतारा नक्कीच उद्बोधक ठरेल.

" आत्मसाफल्याच्या मार्गाने वाटचाल करीत असलेल्या व्यक्ती आपल्या कामात पूजाभावाने रममाण झालेल्या असतात. ती जबाबदारी स्वीकारण्यास तत्पर असते, ती स्वतंत्रपणे विचार करते, ती मूल्यांना महत्त्व देते. स्वत:बरोबर व इतरांशी सर्वबाबतीत ती प्रामाणिकपणे वागते. तिच्या वर्तनामध्ये उत्स्फूर्तता दिसून येते. आपले काम या जगातील सर्वात पवित्र गोष्ट होय अशी तिची श्रद्धा असते आणि मग काम हे काम रहात नाही. ते खेळाइतकेच हवेहवेसे वाटते.""

अशा तऱ्हेने काम करणाऱ्या व्यक्ती संस्थेत आपले अस्तित्व आपल्या कामानेच सर्वश्रेष्ठ ठरवतात. आणि आपले अस्तित्व हे कामाकरिता इतरांच्या दृष्टीने अनिवार्य बनवतात. व्यावसायिकता ही आपण करीत असलेल्या कामात असते, कामाच्या प्रकारात नसते. थोडी सहनशीलता व कृतज्ञता माणसाला प्रगती पथावर नेते आणि म्हणूनच आपल्या कामाची प्रतिष्ठा ही आपण मानलीच पाहिजे. They also serve, who stand & wait.

भारतरत्न विश्वेश्वरय्या यांना परिपूर्णतेची खूप ओढ होती. सर्व काम पवित्र आहे अशी त्यांची भावना होती. ते म्हणत, "तुमचे काम रस्त्यातील एक चौक झाडण्याचे असले तरी आपला चौक हा जगातील सर्व चौकांमध्ये स्वच्छ असला पाहिजे असा तुमचा दृढ निर्धार असला पाहिजे."

" माणूस आपल्या कामातूनच आपला जास्तीत जास्त मानसिक विकास करुन घेऊ शकतो व अधिक अवघड अशा कामांची जबाबदारी पेलण्यास पात्र होतो. असा विकास जेव्हा होतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने माणूस आनंदी व निरोगी असतो. मग ते काम घरचे असो वा बाहेरचे, त्यातून आनंद मिळालाच पाहिजे. प्रत्येकाची अशी सहाजिकच इच्छा असते की इतरांकडून त्याला उत्कृष्ट सेवा मिळावी. परंतु, जेव्हा तो आपले कर्तव्य आणि कार्य सुव्यवस्थितपणे पार पाडतो, तेव्हाच त्याला अशी अपेक्षा करण्याचा रास्त अधिकार प्राप्त होतो. प्रत्येकाने आपल्या ज्ञानाचा, बुद्धीचा, कौशल्याचा, साधनांचा, वेळेचा व शक्तीचा उपयोग आपल्याला दिलेले काम अगदी उत्कृष्टपणे करण्याकरिता करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर, आपल्या सहकाऱ्यांना सर्वतोपरी सहकार्य देणे आवश्यक आहे. जपानमधील आर्थिक विकासाचा वेग सर्व जगात जास्त आहे, याचे एक कारण म्हणजे जपानी लोक आपले दैनंदिन काम आपले पवित्र कर्तव्य आहे असे मानूनच करतात.

म्हणूनच, आपणही आपल्या दैनंदिन कामात, मग ते घरचे असो वा कार्यालयीन असो किंवा समाजसेवेचे

असो, ते आनंदी वृत्तीने व पवित्र भावनेने केले पाहिजे. दुसऱ्यांचे दोष बघण्यापेक्षा त्यांचे गुण उचलावेत, वरिष्ठांबद्दल आदर राखावा आणि आपले काम हे आपल्या पदावर व त्याच्यापासून मिळणाऱ्या फायद्यांवर लक्ष टेवून न करता व्यावसायिक वृत्तीने, प्रेमाने व निष्ठेने करणे हीच आजच्या काळाची सर्वात मोठी गरज आहे. आपले हक्क जितक्या तळमळीने आपण मागून घेतो, तेवढीच तळमळ कर्तव्य करताना असावी. आपल्या कामाची पुर्नरचना करता येणे शक्य आहे का ? कामकाजात कोणकोणत्या सुधारणा करणे आवश्यक आहे ह्याचा विचार प्रत्येक संस्थांनी अवश्य केला पाहिजे.

प्रज्ञावंत ऋषी याज्ञवल्क्य म्हणतात, " माणसाचे व्यक्तिमत्व म्हणजे तो करीत असलेल्या कार्यांची गोळाबेरीज होय. माणसाच्या मरणोत्तर हीच कार्ये मागे उरतात. चांगल्या कृत्यांमुळे माणूस पवित्र होतो, तर वाईट कृत्यांमुळे मात्र तो पापी ठरतो."

---

" संदर्भ :- " **आपले काम आपले जीवन सर्वस्व**"
**लेखक :- श्री. स. आ. सप्रे**
नवी दिल्ली, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, १९८८

**टीप :-**

कार्यालयात सुधारणा घडवून आणण्यासाठी खालील काही गोष्टी अमलात आणता येतील. अर्थात, अधिकारी वर्गाने -

१) वरचेवर सर्व कर्मचारी वर्गाची मिटींग घेऊन त्यांच्यापुढील समस्यांची चौकशी करणे.

२) एकमेकांचे काम हे कसे एकमेकांस पूरक आहे याची जाणीव करुन देणे.

३) कोणतेही काम कमी दर्जाचे नाही ही जाणीव रुजण्यासाठी मधून मधून प्रत्येक कर्मचाऱ्यांना ते करीत असलेल्या योग्य त्या कामाची शाबासकी देणे. तसेच, ते काम अधिक चांगले कसे होईल ह्यासाठी मार्गदर्शन करणे.

४) अधिकारी वर्गाची फेरी रोजच्या रोज प्रत्येक विभागात होणे जरुरीचे आहे. तेथील स्वच्छता, टापटीप, शिस्तबद्धता यांची पाहणी करुन वेळीच समज देणे.

५) प्रामाणिक कर्मचाऱ्यांवर अन्याय होत नाही ना, ह्याची दखल घेणे. छोट्या छोट्या गोष्टींमुळे समाधान मिळते, नाहीतर असंतोष वाढतो. उदा. १० ते ५ ड्युटी असेल तर लवकर सोडताना ११ ते ६ व १० ते ५ ह्यांना एकाच वेळी सोडणे हे अन्यायकारक ठरते.

६) सतत होणाऱ्या चुका, कामावर येण्यातील अनियमितता, सतत घरगुती अडचणींचा पाढा वाचून लौकर जाण्याच्या वृत्तीबाबत कठोर उपाय योजणे वा नियम करणे जरुरी असते.

७) सर्व गोष्टी सर्व कर्मचारी वर्गाजवळ बोलणे किंवा एखाद्याचे वागणे, त्यापेक्षा कनिष्ठ अशा कर्मचाऱ्याजवळ बोलणे टाळावे, कारण हे कार्यालयीन शिस्तीला घातक ठरते.

८) वरचेवर सेमिनार्स, चर्चासत्रे, प्रदर्शने यांचे आयोजन करुन विधायक कार्यात कर्मचाऱ्यांच्या गुणांची जोपासना करणे किंवा त्यांच्या गुणांना वाव देणे.

९) वर्षातून सहल, नववर्षाची पार्टी वा एखादा कार्यक्रम जरुर करावा. त्यामुळे नक्कीच आपपसातले दुरावे कमी होतात.

१०) प्रत्येक कर्मचाऱ्याची कार्यक्षमता ही वेगवेगळी असते. तिचे अवलोकन करुन त्याप्रमाणे कामाची जबाबदारी देणे, किंवा, त्यांच्या मानसिकतेनुसार काम देणे.

११) प्रत्येकात काहीतरी दोष असतात, त्याकडे डोळेझाक करुन त्याचा उल्लेख इतर कर्मचाऱ्यांसमोर टाळणे.

---

**श्रीमती वेदवती हब्बु**, ज.ने. ग्रंथालय, मुंबई विद्यापीठ, कालिना, सांताक्रुझ, मुंबई.

# श्रीमद्भगवत् गीता
## ।। संन्यास योगः ।। (अध्याय ५वा)

गीतेच्या चौथ्या अध्यायावरील लेखानंतर ज्ञानकर्म संन्यास योग या पाचव्या अध्यायावर सौ. भिडे यांनी पाठविलेला लेख देत आहोत. - संपादक

***(सर्व घराघरांसाठी, घरातील सर्वांसाठी 'श्रीमद्भगवद्गीता' सर्वांना सहज समजेल अशी )***

संन्यास आणि योग यांचा समन्वय साधणारा हा अध्याय. या अध्यायास एका दृष्टीने महत्त्व आहे. कारण 'कर्मसंन्यास' व 'निष्काम कर्मयोग' या दोन मार्गांपैकी 'निष्काम कर्मयोग' श्रेयस्कर आहे असे भगवंतांनी स्पष्टपणे सांगितले आहे.

संन्यास मार्ग सामान्यास आचरण्यास कठीण. पण कर्म मार्गाचे अधिकारी जगात खूप आहेत कारण हा मार्ग जाणते व नेणते दोघांना आचरण्यास सुलभ आहे व शेवटी मोक्ष फलदायी आहे.

भगवंतांनी चौथ्या अध्यायात कर्म संन्यासाचीही प्रशंसा केली व कर्मयोगाचाही पुरस्कार केला. मी पूर्ण आहे मला काही मिळवायचे नाही तरी मी कर्म सोडलेले नाही. म्हणून तुही स्वकर्तव्य कर्म कर, युद्धास तयार हो. अरे, ज्ञानाग्नीत सारी कर्मे भस्मसात होतात. अर्जुना, ज्ञानाइतके पवित्र काहीच नाही. 'न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते' असेही सांगतोस तेव्हा मी नक्की काय करायचे ? सर्व कर्मांचा संन्यास करायचा की युद्ध करायचे ? भगवंताच्या बोलण्यातील वैचारिक विसंगतीमुळे अर्जुनाची द्विधा मनःस्थिती झाली. या दोहोत कोणता श्रेयस्कर व आचरण्यास सोपा ते मला सांग.

अर्जुनाचा प्रश्न ऐकून भगवंत स्मितित झाले. कारण आईला जसे दोन मुलात उजवा डावा करता येणार नाही, ही म्हणेल दोघेही सारखेच. तसेच भगवंतांनी उत्तर दिले, दोन्ही मार्ग मोक्षपदालाच जाऊन पोहचवतात. दोघांचे फल एकच. श्रेष्ठ, कनिष्ठ नाहीच. हां पण एक गोष्ट खरी की कर्मसंन्यास म्हणजेच 'ज्ञानमार्ग' हा सामान्यांना आचरायला कठीण मार्ग. त्यापेक्षा कर्ममार्ग आचरायला सुलभ सोपा. शिवाय दोन्हींचे फल एकच. मोक्षप्राप्ती.

अर्जुनाच्या प्रश्नाला भगवंत अत्यंत तन्मयतेने उत्तर देत आहेत. त्याला समजावून सांगत आहेत. अर्जुना पण एक गोष्ट ध्यानात ठेव, बाबा रे कर्मत्यागापेक्षा कर्मयोगाचे आचरण केव्हाही श्रेष्ठच. पण याचा अर्थ असाही नव्हे की मला संन्यास अपेक्षितच नाही. किंबहुना मी म्हणेन की 'नित्य संन्यास हवाच. अगदी गृहस्थाश्रमातही. मी काय म्हणतोय लक्षात घे. संन्यास ही अंतरिक वृत्ती आहे. म्हणजे वृत्तीची निवृत्ती. काम, क्रोध, निष्कामता आणि निर्द्वंद्व वृत्ती म्हणजेच संन्यास. भगवी वस्त्रे, अरण्यात राहणे, म्हणजे संन्यास ही सामान्यांची समजूत. पण मला ते अभिप्रेत नाही.

'संन्यास' किंवा 'ज्ञान' हे वेगळे व 'कर्मयोग' वेगळा असे ज्ञानी लोक मानीत नाहीत. पोरकट, अज्ञानी लोकांची तशी समजूत असते. ही एक अंतरिक वृत्ती तर दुसरा तिचा बाह्य अविष्कार. ज्ञानाने जे फळ मिळते तेच कर्मानेही मिळतेच. किंबहुना ज्ञान व कर्म वेगळी नाहीतच.

आत्मज्ञान = संन्यासी = स्थितप्रज्ञ = कर्मयोगी.

नित्य संन्यासी म्हणजेच दुसऱ्या अध्यायातील स्थितप्रज्ञ, तोच या ५व्या अध्यायातील आत्मज्ञानी व

तिसऱ्यातील कर्मयोगी.

अर्जुना, तुला सांगतो, 'कर्मयोगाच्या आचरणावाचून संन्यासाची प्राप्ती (म्हणजेच 'ज्ञान') होणे अशक्यच ! पण कर्मयोगी मात्र ज्ञान तात्काळ मिळवतो.

समजा एखादा डॉक्टर म्हणाला मी डॉक्टरी विद्या शिकलोय पण मी रोगी तपासणार नाही. तर त्याच्या ज्ञानाचा काय उपयोग ? त्याने कर्म केले नाही तर ! चुलीत घाला ते ज्ञान. दुसरा रोग्यांची सेवा करायला तयार आहे. पण त्याला डॉक्टरी विद्येचे ज्ञान नाही. तरीही काय उपयोग आहे त्या सेवाकर्म करण्याचा ! <u>कर्म हे ज्ञानाचे प्रत्यक्ष रूप आहे. कारण कर्माविना ज्ञान पांगळं व ज्ञानाविना कर्म आंधळं.</u>

'आणि मी माझे ऐसी आठवण । विसरले ज्याचे अंतःकरण । पार्था तो संन्यासी जाण । निरंतर ॥ अ. ५-२० ज्ञाने.

'आतां गृहादिक आघवें । तेंव्हाही नलगे त्यजावें । जें घेंते जाहलें स्वभावें । निःसंग म्हणऊनि ॥ अ. ५-२२ ज्ञाने.

'ज्ञेयः स नित्य संन्यासी यो न द्वेष्टि न कांक्षति ॥ ३-५ गीता

संन्यास व योग एकरूप आहेत हे जो समजेल तोच सारे रहस्य समजला असे जाण.

गीतेत संन्यास आश्रम अशी कल्पना नाही. गीता संन्यासी वृत्ती निर्माण करू इच्छिते. संन्यासाचा तांडा नव्हे. संन्यासी वृत्तीने जीवन कर्मे करणे म्हणजेच संन्यास. हाच संन्यास भगवंताला नित्य हवा आहे.

एकनाथ महाराज ' सर्व कर्मी समाधी' सांगतात. म्हणजेच सर्व कर्मे करूनही ज्याची समाधी भंग पावत नाही अशी समाधी. स्वतः एकनाथ, तुकाराम, नामा, सावता, चोखा, गोरा कुंभार, विसोबा खेचर हे सर्वच याची जातिवंत उदाहरणे आहेत. या कर्मयोग्यांनी त्यांची कर्मे टाकली नाहीत तर काम क्रोध आसक्ती टाकली व कर्म परमात्म्यास अर्पण केले. हाच यज्ञ.

सर्वत्र समदर्शन हेच परमात्म्याचे ज्ञान. ज्ञानाचे साधन कर्मयोग व परिणाम ही कर्मयोगात होतो. परमात्म्याप्रमाणे आपणही लोकांनी आदर्श म्हणून कर्म करावे. हे चौथ्यात सांगितलेय. तसेच हे ज्ञान स्थूल देहाच्या पातळीवरून होत नाही. त्यासाठी साधना करावी लागते. हे या ५व्या अध्यायात सांगितले आहे.

ज्ञान- आत्मज्ञान, विज्ञान-विश्वज्ञान, लक्षात घे कामक्रोध यामुळे या दोघांचा नाश होतो. आणि संन्यास म्हणजे काम-क्रोध जिंकणे. १००च्या नोटेत १००रुपये दडलेले असतात तशी संसारात आसक्ती. कर्माचे अकर्म व्हावे. पण अकर्म होण्यासाठी अहंकाराची आहुती आवश्यक. स्वधर्माचरण रूपी कर्मे विकर्माची कास धरून म्हणजे मनापासून, मन ओतून केली की अशी एक अवस्था येते की कर्मांचे क्लेश जाणवत नाहीत. आईला मुलाला जन्म देण्याचे कष्ट वाटत नाहीत. सूर्याला उगवण्याचे, आकाशाला अधांतरी राहण्याचे, पाण्याला वाहण्याचे कुठे काय श्रम होतात. तो त्यांचा सहज भाव आहे. विनोबाजी म्हणतात, हीच तर कर्मयोगाची किल्ली आहे. ती मनोजयाने मिळते. अहंकार एकदा का गेला की मन निर्मळ होते. मग कर्मांची जाणीवही होत नाही. ते सहज कर्म होते. तो स्वभाव धर्म होतो.

मी उगवलोय असा डांगोरा सूर्य पिटत नाही. त्याच्या अस्तित्वाने सारे जग चालते. तो काहीच करत नाही तरी त्याच्या अकर्मात कर्म ठासून भरलेले असते. प्रकाश हा त्याचा सहज धर्म, सत्कर्म हा संताचा सहज धर्म. संताचे कर्म ही अकर्मदशाच. या दशेलाच 'संन्यास' म्हणतात. 'संन्यास' म्हणजेच अकर्म दशा. या दशेला कर्मयोगही म्हणतात.

स्वधर्म कर्म करणे हा योग.

कर्म करूनही न केलेसे वाटणे हा संन्यास.

जो मनापासून निष्काम कर्म करतो त्याला लेप लागत नाही. कर्मबंधन पडत नाही. म्हणून तो योग व करूनही काहीच न केले वाटणे म्हणजे संन्यास. भडाभडा बोलण्यापेक्षा मौनात खूप ताकद असते. आई नुसती जवळ असली की मूल खेळते तसेच सूर्य उगवला की जग चालते.

कर्मयोगी श्रेष्ठ की कर्मसंन्यासी हे सांगणे कठीण. दोन्ही योगच पण तुलनेसाठी एकाला 'योग' व दुसऱ्याला 'संन्यास' म्हटले आहे. दगड म्हटले काय धोंडा म्हटले काय? एकच. तद्वत कर्मयोगी व कर्मसंन्यासी.

सर्व करून काही न करणारा - कर्मयोगी - उदा. श्रीकृष्ण, जनक, एकनाथ, तुकाराम

काही न करता सर्व करणारा - कर्म संन्यासी - उदा. शुक, याज्ञवल्क्य वगैरे.

अकर्म दशेच्या दोन प्रकारांची प्रत्यक्ष तुलनाच केली आहे. म्हणून ५वा अध्याय खूप उंचीवर नेऊन सोडतो. लोकांचे कर्तृत्व, त्यांची कर्मे, कर्मफळ या गोष्टी परमात्मा स्वतः करीत नाही. तर स्वभाव म्हणजे प्रकृतीच हा सगळा खेळ करते. ज्ञानी, निरहंकारी मी कर्ता नाही हे जाणतात तर प्रकृती गुणांना कर्मे होतात. प्रकृती स्वभावतः कर्मशील आहे. जीवाचे बोलणे, चालणे, पापण्यांची उघडझाप, श्वासोश्वास, त्याग, भोग, ज्ञानग्रहण वगैरे. इंद्रियेही आपापल्या विषयाच्या ठायी आपोआप प्रवृत्त होतात. हे ओळखून मी काहीच करत नाही हे जाणून कर्तेपण स्वतःकडे घेत नाहीत. ज्यांची मनबुद्धी परमात्म स्वरूपी निरंतर स्थिर झाली त्याचे पाप आत्मज्ञानाने समूळ धुवून जाऊन त्यांची जन्ममृत्यूची येरझार संपते. दोन्ही एकच तरी संन्यासापेक्षा योग श्रेष्ठ का ? याची कारणे भगवंतानी सांगितली आहेत. (१) मुळीच कर्म न करता सर्व कर्म करणे ही कला सिद्धालाच शक्य, साधकाला नाही. (२) परंतु सर्व करून काहीच न केले या तऱ्हेचे अनुकरण साधकाला शक्य. (३) साधकाला कर्मयोग मार्गाही आणि मुक्कामही (४) संन्यास मुक्कामावरच आहे मार्गात नाही. म्हणून कर्मयोग साधकाच्या दृष्टीने श्रेष्ठ आहे. (५) १२व्यात निर्गुणापेक्षा सगुण श्रेष्ठ असे भगवंतानेच सांगितले आहे. सगुणात सर्व इंद्रियांना काम आहे. निर्गुणात तसे नाही. म्हणून (संन्यास) ज्ञानमार्गापेक्षा कर्मयोग अनुकरण सुलभ आहे. सगुणात सर्व इंद्रियांनी पूजा करायची. निर्गुणात फक्त ध्यान. (मन एकाग्र होणे सर्व सामान्यांना कठीणच.)

कर्मयोगात - कर्मांचे भूत बाहेर नाचताना दिसते. (देह कर्मे करतांना दिसतो.) अंतर्याम शांत.

(संन्यास) ज्ञानयोगात - बाहेर शांत आत त्रिभुवन हलविण्याचे सामर्थ्य. जसे दिसावयाचे - तसे नसावयाचे हे दोघांचे स्वरूप. पाण्यातील कमळाप्रमाणे पापापासून अलिप्त राहून कर्मयोगी सर्व कर्मे लोकांना आदर्श म्हणून करून ती कर्मे परमेश्वरास अर्पण करतो. तो कर्मयोगी नवद्वारे असलेल्या देहनगरात आत्मानंदात राहतो.

पूर्ण कर्मयोग हा संन्यास. तर पूर्ण संन्यास हा कर्मयोग. काही भेद नाही. साधकाच्या दृष्टीने फक्त कर्मयोग सुलभ. पूर्णावस्थेत दोन्ही एकच. निष्कामता, द्विद्वंद्व स्थिती. ज्ञान (संन्यास) व कर्मही पृथक नाहीत. ज्ञानातून कर्म व कर्मातून ज्ञान. ज्ञान व कर्म एकच. उदाहरण सांगतात. आकार + गोडी + वजन = बर्फी. तिन्ही मिळून बर्फी. बर्फीतून आकार, गोडी, वजन वेगळे करता येत नाहीत. कर्म ज्ञानाचे प्रत्यक्ष रूप व ज्ञान हे कर्माचे अंतरिक रूप.

नाटक पहाताना आपण अलिप्तपणे त्या पात्रांच्या सुखदुःखाशी एकरूप होतो, समरस होतो. मी म्हणजे ती पात्रे नाही. हा भाव मनात असतो, ही जाणीव जागृत असते. प्रेक्षक म्हणून मी साक्षी असतो. साक्षीभावाने आपण नाटक पाहतो. हाच साक्षीभाव कर्मयोग्यापाशी हवा.

प्राचीन काळी मान्यता पावलेली सहा शास्त्रे. त्यात कपिल मुनींचे सांख्य शास्त्र. भगवंत या सांख्य शास्त्राचे श्रेष्ठत्व मानतात. कपिल मुनी ही माझीच विभूती असे भगवंत सांगतात. त्यांचा सांख्य शास्त्राचा सिद्धान्त थोडक्यात पाहु या - या विश्वात पुरुष प्रकृती ही दोन तत्वे आहेत. पुरुष- आत्मा, प्रकृती - निसर्ग. सत्व-रज-तम या त्रिगुणांनी युक्त ही जडसृष्टी आहे.

आपल्या रोजच्या पाहण्यातले उदाहरण सांगते म्हणजे हा सिद्धान्त एकदम सोपा वाटेल. आपल्या घरात आपण कितीतरी विजेवर चालणारी उपकरणे वापरतो. टी.व्ही., फ्रीज, पंखा, इस्त्री, दिवे, रेडिओ, मिक्सर, कॉम्प्युटर, गीझर वगैरे. एक वीजेचा (करंट) प्रवाह चालू झाला की सगळी उपकरणे आपापली कामे करायला लागतात. पंखा फिरतो, दिवा प्रकाश देतो, फ्रिज थंड करतो, गीझर गरम करतो, रेडिओ आवाज ऐकवतो, टी.व्ही. चित्र आवाज दोन्ही दाखवतो/ऐकवतो. म्हणजे परस्पर विरोधी कार्ये एका वीजेच्या उर्जेमुळे होतात. (ही वीज म्हणजेच चैतन्य - परमात्म शक्ती पुरुष) ही उपकरणे म्हणजे प्रकृती- निसर्ग. वीज गेली की उपकरणे बंद. पण एक लक्षात घ्या दुरुस्ती वीजेत करावी लागत नाही त्या उपकरणात, यंत्रात करावी लागते. वीज प्रवाह खंडित होतो तो त्या उपकरणातील दोषांमुळे. वीज नित्य जिथे जशी असते तिथे ती तशीच असते. या उपकरण(यंत्र) व वीज यांच्याप्रमाणेच प्रकृती पुरुषाचे कार्य. 'अनंत रूपे अनंत वेषे पाहिला मी त्यासी' असे ज्ञानेश्वर माऊली म्हणतात ते म्हणूनच. विविध रूपांनी विविध वेषांनी ही नटलेली प्रकृती म्हणजेच परमात्म्याचे सगुण साकार रुप. 'योगिया दुर्लभ तो म्या पाहिला साजणी' जे जे या चराचरात पाहतो ते श्रीहरीचेच रुप. परमेश्वर परमेश्वर म्हणतात तो याहून वेगळा नाही. ज्ञानेश्वर महाराज सर्वत्र परमात्म्याचे रुप पाहतात.

या गतीच्या सृष्टीमागील परमात्मतत्त्व ज्याला कळले, त्याने आपली मन-बुद्धी त्यावर स्थिर केली त्याला पुन्हा अज्ञानाचा स्पर्श होत नाही. तो ज्ञानामुळे निष्कलंक होतो. तीच समदृष्टी म्हणजे कीडा, मुंगी, पशु-पक्षी, चांडाळ, ब्राह्मण, मुनी या सर्वांत एकच परमात्म्यतत्त्व आहे हे जाणणे हेच समदर्शन. या वरच्या आकारास उपाधी म्हणतात. या उपाधी मुळे जगात विविधता दिसते. मूळ चैतन्य सर्वांठायी एकच. नाम रुप टाळून आत पहाणे म्हणजे अंतर्मुख होणे. अंतर्मुख होणाऱ्यास आत्मदर्शन होते. त्याला इंद्रियजन्य नसलेला असा आत्मानंद होतो. यालाच भगवंत संन्यास म्हणतात.

शब्द-स्पर्श-रुप-रस-गंध हे पाच विषय इंद्रियांचे. जीवन जगणे म्हणजे या पाचांचे सेवन करणे. इंद्रियजन्य भोग हे नाशिवंत व क्षणिक सुख देणारे. आत्मदर्शन हेच चिरंतन सुख. पण हे लक्षात घ्या की इंद्रिय पातळीवरुन हे होणे शक्य नाही. इंद्रियांना स्थूल दर्शन होते. समतोल मन सुखी आणि आनंदी राहते. ब्रह्मदर्शन म्हणजेच समतेचे दर्शन. त्याने परमशांती लाभते.

योग्यांना ध्यानाने
संतांना साक्षात्काराने
वैज्ञानिकांना विश्लेषणाने
कवींना प्रतिभेने
समदर्शन होते.

अहंकाराच्या संकुचित परिघाबरोबर झेप घेतली तर समदर्शन होईल. आत्मज्ञान होईल. ज्ञानाचा परिणाम कार्यात होतो. ज्याला ब्रह्मदर्शन झाले असा ज्ञानी सर्वांच्या हिताचीच कर्मे करतो. भगवंत म्हणतात ' कर्मयोगा वाचून संन्यास प्राप्त होणे कठीण आणि संन्यासाविना कर्मयोग.'

कर्म हेच ज्ञानाची कसोटी.

पूर्ण कर्मयोग हा संन्यास तर पूर्ण संन्यास हा कर्मयोग.

कर्मे म्हणजे मनाची साकार मूर्तीच.

'ज्ञानाविना कर्म आंधळे, तर कर्माविना ज्ञान पांगळे' 'गीता' लो. टिळकांनी 'गीता रहस्य' लिहून कर्मपर केली. त्यातून त्यांनी वरील संदेश जगाला दिला. 'गीता' उपनिषदांप्रमाणे अरण्यात प्रकटली नाही तर जीवन संग्रामाचे प्रतीक असलेल्या महाभारतात सांगितली. 'गीता' वेदवेदान्ताचे सार, अनादिस्वयंसिद्ध, पवित्र ज्ञान प्रकट करणारी भगवंताची वाङ्मयमूर्ती आहे. अनादी मायेत (अज्ञानात) झोपलेल्या जीवांना (श्रुतीचा गजर करुन) जन्ममरणरुपी संसार स्वप्नातून जागे करणारे गीता हे अध्यात्म विज्ञान आहे. जे श्रद्धेने, शुद्धभावनेने मनाचा कान करुन ऐकतील त्यांना त्यांच्या जीवनात 'जो जे वांछिल तो ते लाहो' या माऊली ज्ञानेश्वरांच्या वचनाचा निश्चितच प्रत्यय येईल.

'द्वंद्वात रहा पण निर्द्वंद्व रहा' हा गीतेचा संदेश. शोक व मोहातीत होणे यातच गीता ज्ञानाची परिणती आहे. गीतेत केवळ ब्रह्मविद्याच नसून योगशास्त्रही सांगितले आहे. प्रत्येक अध्यायाच्या शेवटी 'इति श्रीमद्‌भगवद् गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे...' असे म्हटलेले आहे.

त्या सच्चिदानन्द स्वरुप आत्मतत्वाचे 'अज्ञानाच' मानवी जीवनातील सर्व अनर्थाचे, असंतोषाचे, शोकमोहाचे, दुःखाचे मूळ कारण आहे. हेच जीवाचे जन्ममरणरुपी बंधन होय. विनाश पावणाऱ्या या जगतात त्याचे जे 'अविनाशी' अधिष्ठान चेतनस्वरुप आहे त्याचा चिंतनात शोध घेऊन सर्वात्मभावाने ते 'आत्मस्वरुप' जाणून आन्तरिक दृढ शांतता व 'बाह्य समता' (Inner peace and outer Harmony) राखून ईश्वर भक्तीपूर्वक सेवामय जीवन जगणे हेच बुद्धीमान मानवाचे जीवन 'सफल' व 'सार्थक' होण्याचे रहस्य आहे.

शास्त्र व गुरुवाक्यानुसार 'आत्मज्ञान' संपादन करुन ते आत्मसात करणे हीच मानवाच्या 'समस्त दुःखांची' कारण सहित निवृत्ती व परमानंद प्रदान करणारी परम पुरुषार्थाची (मुक्तीची) साधना आहे. 'जळ वरिवरी क्षाळी मळ। योगिता सबाह्य करी निर्मळ। उदक सुखी करी एकवेळ। योगी सर्वकाळ सुखदाता॥ एकनाथ महाराज- गुरुचे, संताचे महात्म्य असे वर्णितात. सूर्याचे प्रकाशदान, नदीचे वाहणे, पाखरांचा किलबिलाट, अग्नीची उष्णता हे प्रत्येकाचे स्वभाव धर्म आहेत तद्वतच संताचे जगणे.

गीतेचे प्रयोजन ज्ञान निष्ठापूर्वक मोक्ष, कैवल्य. 'श्री गीता हे सप्तशती। मंत्र प्रतिपाद्य भगवती। मोह महिषा मुक्ती। आनंदली असे॥ ज्ञाने. १८-१६६७

शोक मोह रुपी अज्ञानाचा नाश आत्मज्ञानानेच होऊ शकतो. सामान्य माणसाचे मानसिक व बौध्दिक व्यक्तिमत्त्व लक्षात घेऊनच अधिक सहानुभूतीपूर्वक अर्जुनाचे निमित्त करुन संपूर्ण मानवतेशी भगवंताने गीतेत सवलिक साधली आहे.

विश्वरुप दर्शनाला अर्जुन घावरला कारण मिटल्या डोळ्यापुढेही ते दिसतच राहिले. न केल्यानेही जे होते ते कसे टाळावे ? तर अशा कर्माचा संन्यास करण्याची रीतच मुळी अशी की यच्चयावत कर्मे करीत राहूनही ती गळून पडतील अशी युक्ती साधायची. (म्हणजेच अकर्म) कर्मे करुनही ती केल्यासारखी न वाटणे (ते सहज स्वाभाविक कर्म होणे) सूर्याचे उदाहरण यासाठी अगदी योग्य आहे. 'मी कुठे काय करतो ? प्रकाशदान हा माझा स्वभावधर्मच आहे. माझ्याजवळ चिमटीभर अंधार आणून द्या. तो मी घालवला तर म्हणा, मी कार्य केले. म्हणूनच

चौथ्यात भगवंत म्हणतात की प्रथम हा योग मी सूर्याला सांगितला. चोवीस तास कर्म करूनही लेशमात्रही कर्म करीत नाही. हेच अकर्म. त्यासाठी सूर्याचे उदाहरण ठळकपणे पुन्हा पुन्हा डोळ्यापुढे येते आणि पुन्हा पुन्हा सांगावेसे वाटते. अकर्माचे कर्म सर्वांना कळावे म्हणून.

या अध्यायात गीतेतील नैष्कर्म्य (म्हणजेच अकर्म) स्थितीचो उद्‌बोधक चर्चा आली आहे असे ज्ञानेश्वर माऊली म्हणतात. आत्मज्ञानी पुरुष हा ईश्वराप्रमाणेच असतो. ईश्वर जगातील सर्व प्राणिमात्रांना व्यापून असूनही कोणाबद्दल आसक्ती धरीत नाही. इतकेच काय पण जगाच्या उत्पत्ती विनाशाचाही त्याला पत्ता नसतो. माझ्या अस्तित्वामुळे जगाची उत्पत्ती विनाश करणे हा प्रकृतीचा स्वभावधर्म आहे. सगुणात असतानाही त्याच्या निर्गुणपणात न्यूनता येत नाही. पण ईश्वराच्या ठिकाणी लोक अज्ञानाने कर्तृत्वाचा आरोप करतात.

कर्मयोगीही सर्वांप्रमाणे कर्मे करताना दिसतो. तरीपण तो निष्कामपणे व द्वंद्वातीत कर्मे करीत असल्यामुळे ते आत्मानंदात तल्लीन असतात. देही असतांनाच ते साक्षात ब्रह्म झालेले असतात. योगी यम-नियम, प्राणायामद्वारा वृत्ती अंतर्मुख करून (एकाग्र करून) याच देही ब्रह्म होतो. भगवंत म्हणतात, हे अर्जुना तू नुसता ऐकणारा नाहीस तर आचरणाराही आहेस म्हणून तुला सद्यंत योगमार्ग सांगतो. असे सूतोवाच करून हा अध्याय इथेच संपवितात.

सर्व विश्वाचा स्वामी परमात्माच आणि सर्व भूतांमध्ये आत्मतत्व आहेच. 'परमात्मा' कुणी विशिष्ट व्यक्ती नाही. आपलीच व्यापकत्वाची जाणीव म्हणजेच परमात्मा. 'तुका आकाशा एवढा' असे तुकाराम महाराज म्हणतात ते आपल्या व्यापकत्वाची जाणीव झाल्यामुळेच. या अध्यायाचे नाव 'संन्यासयोग.' संन्यासाच्या म्हणजेच ज्ञानाच्या भूमिकेवरून आचरलेला (कर्म) योग असा त्याचा अर्थ करायला हवा. संन्यास व कर्मयोग यांची एकरूपता (ज्ञान-कर्म समन्वय) दाखवली आहे.

न करून सारे केले व सारे करून लेशमात्रही न केले. अकर्मात ठासून कर्म भरलेले आहे. केवढी उदात्त रसमय काव्यकल्पना ही! सूर्य प्रकृती गुणांमुळे उगवतो (स्वाभाविक स्वभावधर्मामुळे) त्यामुळे सारे विश्व कर्म चालते. सूर्य काहीच करत नाही तरी त्याच्या उगवल्यामुळे सारे विश्व चालते. असा हा पाचवा अध्याय खूपच उंच अशा भूमिकेवर नेऊन बसवला आहे.

**आशा भिडे**
बी/१, विजय अपार्टमेंटस्‌ 'आराधना' टॉकीज जवळ,
ठाणे (प) : ४०० ६०२,
फोन नं. : ५४१ ०१४०

## दिशा साठी

दिशासाठी आपण खूप काही करू शकता. वैचारिक साहित्याचे जतन करावयाचे असेल, विचार परंपरा चालू ठेवायची असेल तर वाचक म्हणून आपणच हे करायला हवे.

- दिशासाठी जाहिरात मिळवून देऊ शकता.
- नव्याने वर्गणीदार होऊ शकणाऱ्या वाचकांना दिशाची माहिती देऊ शकता.
- दिशासाठी लेखन करू शकता.

# व्यंकटेश माडगूळकर (एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व)

बी. ए. च्या लेखक अभ्यास या प्रश्नपत्रिकेचा अभ्यास करताना आमची विद्यार्थीनी अरुणा विचारे हिला जाणवलेले माडगूळकर या लेखातून व्यक्त झाले आहेत. - संपादक

मराठी सारस्वतावर अस्सल देशीपणाची मुद्रा उमटवणारे चतुरस्त्र साहित्यिक म्हणजे व्यंकटेश माडगूळकर. त्यांचा जन्म १९२७ साली औंध संस्थानात झाला. फारसे काही शिक्षण नसताना आपल्या अंतःकरणात वसत असलेल्या जातिवंत कलावंतांची प्रज्ञा अंगी असल्याने या महाकाय महानगरीत स्वतःला हरवून न बसता मराठी साहित्यात स्वतःची एक वेगळी छाप उमटवली. त्यांच्या सूक्ष्म व्यक्ति चित्रणामुळे मराठी कथेला नवे सामर्थ्य प्राप्त झाले. मराठी साहित्यात शिकार कथा व वन्यजीवसृष्टीचे अनुभवाधारित अस्सल चित्रण प्रथमच आणणाऱ्या माडगूळकरांनी माणदेश हा शब्दही नागर साहित्यिक, वाचकांना परिचयाचा करून दिला. अद्भुतता, स्वप्नरंजन, कल्पना रम्यता यांच्या पकडीतून वाचकांना सोडवून वास्तवादी ग्रामीण साहित्याचा त्यांनी आरंभ केला. १९४७ नंतर बदललेली मानसिकता मूल्यांची परवड, स्वार्थी वृत्ती या सर्वांना स्थान देऊन नवकथा लिहिल्या व मानवाच्या मनाचा तळ गाठण्याचा प्रयत्न केला त्यांच्या अनेक पुस्तकांना महाराष्ट्र राज्य पुरस्कार लाभले. ५७ व्या अखिल भारतीय (अंबेजोगाई) मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. त्यांच्या ग्रामीण कथांनी मराठी साहित्याच्या कक्षा रुंदावल्या.

तमाशा, चित्रपटकथा, कादंबरी, कथा, नाटक, ललित गद्य इ. अनेक साहित्य प्रकार यशस्वी रीतीने हाताळले. माडगूळकरांचे सारे लेखन एका कलदंर, आत्मालीन आणि भावनिर्भर अशा कलावंताचा आत्माविष्कार आहे. त्यांच्या वृत्तीला ध्यास होता तो जगातील सर्वश्रेष्ठ अशा साहित्याच्या आणि कलेच्या आस्वादाचा. निसर्गातील रंगरुपसुगंधाची साद त्यांना ऐकू येत होती. आणि त्या तंद्रीत निसर्गातील गूढे उकलीत राहण्यात ते तन्मय होत. त्यांचे लेखन चाकोरीत गुंतले नाही, आणि क्षीण झाले नाही. अनुभवाचे आणि आविष्काराचे नित्यनूतन उन्मेष त्यांची प्रतिभा निर्माण करीत होती. त्यामुळे त्यांचे लेखन वेधक विलोभनीय व केवळ तेच लिहू शकतील असे आहे.

**अभिजात साहित्य सेवा :**

ते एक अभिजात लेखक होते. 'बनगरवाडी' आणि 'कोवळे दिवस' या त्यांच्या कादंबऱ्या आणि 'एका लेखकाचा प्रवास' हे आत्मकथन हे हृदयंगम लेखनाचे वस्तुपाठ आहेत. त्यांनी वग लिहिले, नाटके लिहिली, स्तंभलेखन केले, अनुवाद केले, रानावनाविषयी प्रत्ययकारी लेखन केले. एका लेखकाला एका जन्मात लाभायचे असतात ते सर्व मानसन्मान त्यांच्याकडे चालून आले. त्याची त्यांनी कधी याचना केली नाही.

'काळ्या तोंडाची' या कुत्रीवरील कथेपासून कथालेखनाला सुरुवात केली. त्यांनी ज्यावेळेस साहित्य सृष्टीत प्रवेश केला त्यावेळेस दुसऱ्या महायुद्धाचा तडाखा संपूर्ण जगाला सोसावा लागत होता आणि अशा परिस्थितीत मराठी कथा प्रेमाच्या व ध्येयांच्या रोमँटिक कल्पना चित्रित करण्यात गुंतली होती. अशावेळेस गरज होती ती समाजाला जागृत करणाऱ्या साहित्याची. तेव्हाच नवकथेचा जन्म झाला. या नवकथेने संपूर्ण मानवी मन

त्याचे विविध पापुद्रे उलगडून दाखवण्याचा प्रयत्न केला. पु. भा. भावे, अरविंद गोखले, गंगाधर गाडगीळ या नवकथाकारापेक्षा माडगूळकर वेगळे ठरले कारण ते केवळ माणसात रमले नाही तर माणदेशाच्या पार्श्वभूमीवर जी जी माणसे भेटली ती, ती त्यांनी वाचली म्हणूनच त्यांच्या कथेत जिवंतपणा आढळतो.

त्यांची साहित्य संपदा वैविध्यपूर्ण व नाविन्यपूर्ण असल्याने वैशिष्टपूर्ण ठरली आहे. त्यात १० नाटके, ८ कादंबऱ्या, संकलित व संपादित असे मिळून १७ कथा संग्रह, प्रवास वर्णने इ. आहेत. अष्टपैलू व्यक्तिमत्व जीवनात जेथून जेथून रस मिळतो तेथून तो अनुभवण्याचा प्रयत्न करते. आणि म्हणूनच त्यांच्या संबंध साहित्यातून त्यांची संवेदनशीलता दृकश्राव्य चित्रिकरण, अल्पाक्षरत्व, मानवी अंत:प्रेरणेचा शोध घेण्याची मानसिकता, ग्रामीण जीवनाबद्दल अपार प्रेम दिसते. त्यामुळेच ग्रामीण कथेला एक वेगळी दिशा देण्याचे काम त्यांनी केले असे **डॉ. प्रल्हाद वडेर** म्हणतात.

**वृत्ती प्रवृत्ती :**

माडगूळकरांच्या साहित्याचा, साहित्य प्रकारचा स्वतंत्रपणे विचार केला तर त्यातून त्यांची वृत्ती प्रवृत्त मानसिकता दिसते.

त्यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे स्वच्छंद रानोमाळ भटकंती करणारे, निसर्गप्रेमी शिकारी असे होते. माणदेशाच्या पार्श्वभूमीवर लहानपणी धनगर, रामोशी, वैदू, महार यांच्या बरोबर भटकंती करण्यात गेल्याने ते निसर्गाशी एकरुप झाले. आणि त्यातूनच, 'पांढऱ्यावर काळे' 'नागझिरा', 'जंगलातील दिवस', यासारखे ललित लेख साकार झाले. एकीकडे जनमानसातून लांब जावून एकाकी जीवन जगण्यासाठी, प्राण्यांना समजण्यासाठी जंगलात राहिलेल्या दिवसातून ही पुस्तके साकार झालेली आहेत. त्यात प्रसंग चित्रणे, भटकतीतील अनुभव जंगलातील अनुभव, लोककला, प्राणी पक्षी झाडे हे सारे रंग रेषा आणि शब्दांच्या विविध परिमाणांना व्यक्त झाले आहेत. एकाच आयुष्यात अनेक आयुष्य जगलेल्या माणसाचे स्वच्छ, पारदर्शक, नितळ दर्शन या लेखातून घडते. आणि त्यातून निरीक्षण शक्ती, चौकसबुद्धी, चिंतनशीलता व जीवनोत्सुकता हे विशेष जाणवतात.

माडगूळकरांचा खरा पिंड कथाकाराचा जरी असला तरी कादंबरीच्या क्षेत्रात 'बनगरवाडी' 'व सतांतर' हे दोन महत्त्वाचे टप्पे त्यांच्या नावावर आहेत. माणूस अंत:र्बाह्य शोधणे, पाहणे हा त्यांचा छंद होता आणि म्हणूनच त्यांच्या कादंबरीत अनेक वृत्ती-प्रवृत्तीची माणसं येतात. मग ती 'बनगरवाडी' असो किंवा 'कोवळे दिवस' किंवा 'करुणाष्टके', 'चित्रकथी', 'वावटळ' कोणतीही साहित्य वृत्ती असो, त्यात व्यवहारी जगाच्या दृष्टीने निरुपयोग वाटणारी माणसं, दरिद्री, उपेक्षित अडाणी माणसं येतातच. त्यांची कादंबरी म्हणजे अशा माणसांच जगंच आहे 'बनगरवाडीत' धनगराच्या जीवनाला स्पर्श केला - तर 'वावटळ' या कादंबरीत गांधी हत्तेनंतरच्या प्रतिक्रिया पडसाद स्पष्ट होतात. 'करुणाष्टकात' त्यांची सोशिक आई आढळते. त्यायोगे मध्यमवर्गीय सोशिक स्त्री दिसते. 'पुढचं पाऊल' ही दलितावरील उल्लेखनीय कादंबरी आहे. 'कोवळे दिवस' ही कादंबरी म्हणजे त्याचे आत्मकथनच आहे. बालपणापासून राजाच्या मनात जी संकटाची वादळे उठतात ती, मोठे झाल्यावर 'उमा' व 'यमू' याच्यामुळे बदलणारे भावविश्व रंगवताना एक नैराश्याची छटा दिसते. 'हातात जसे पत्ते येतात तोच घेऊन डाव खेळावा लागतो तसेच जीवनाचेही असते' हे जीवन सूत्र ते सांगतात.

त्यांनी नाट्य सृष्टीतही महत्त्वपूर्ण कामगिरी केली १९५५ ते १९८५ या काळात १) बिन बियाचे झाड २) कुणाला कुणाचा मेळ नाही तू वेडा कुंभार ३) सती ४)

विकट वाट वहिवाट ५) नामा सातपुते ६) पती गेले ग काठेवाडी ७) देवाजीने करुणा केली अशी विविध आशय - विषय असलेली नाटकं रंग-भूमीवर आणली. लोकनाट्यामुळे ग्रामीण जीवनाचे वास्तव रंगमंचावर आले. कथाक्षेत्रात त्यांनी नवीन दिशा दाखवली- आपल्याला आलेले अनुभव, प्रसंग जसेच्या तसे रंगरेषाच्या शब्दांच्या माध्यमातून त्यांनी वाचकांपर्यंत मांडले - 'काळी आई' 'माणदेशी माणस' 'गावाकडच्या गोष्टी' 'जांभळांचे दिवस', ' बाजार' या सारख्या कथासंग्रहानी कथा विश्व ढवळून निघाले. ग्रामीण जीवनातील वास्तवता 'कोवळे दिवस' मधील राजा व उमा यांचे प्रेम ज्या हळुवारतेने व संयमाने रंगवलेले दिसते ते केवळ त्यांच्या चित्रकार व्यक्तिमत्त्वामुळेच. अगतिकता, त्याचबरोबर तेथील माणसांची रांगडी वृत्ती, लबाडी, दारिद्र्य इ. सूक्ष्मतेने दाखवून मराठी ग्रामीण कथेच्या कक्षा रुंदावल्या. या सर्व कथा संग्रहातून माणसाच्या स्वभावाचे इरसाल नमुने पहावयास मिळतात.

त्यांना चित्रकलेची आवड होती. 'व्हॅन गॉग' हा चित्रकलेच्या क्षेत्रात त्यांचा देव होता. प्रत्येक कलाकृतीतून त्याचे चित्रकार व्यक्तिमत्त्व डोकावते. 'नागझिरा' सारख्या ललित लेखातून त्यांनी वनविद्या सजीव केली आहे. जंगलातील बदलणाऱ्या रंगसंगतीला ते रंगपंचमीची उपमा देतात. प्रत्येक प्रकारच्या आरंभीला किंवा मजकुरात लेखकाने काढलेली दमदार, ठाशीव पण लवचिक रेषांची रेखाचित्रे सुंदर आहेत. व्याख्यानात खुलासा करणारी चित्रे प्रक्षेपित करतात तशी ही चित्रे. खुलासा चित्रे नाहीत तर आदिम प्राणी सृष्टीचे अंतरग सूचित करणारी सृजनशील रेखाचित्रे आहेत. त्याच्या समग्र साहित्यातून काही वैशिष्टे जाणवतात ती म्हणजे नाट्यमय भाषाशैली, अल्पाक्षरत्व, जीवनानुभवाचे दर्शनि निवेदन चातुर्य इ. त्यांच्यावर काळाचा प्रभाव दिसतो. समकाली संघर्षमय जीवनाचा प्रत्यय साहित्यातून विशेषतः कादंबरीतून दिसतो. गांधी हत्या, स्वातंत्र्य प्राप्ती यातून साहित्याला एक चिंतनात्मक जोड दिसते. पण यासर्वांतून एक जाणवते ते म्हणजे त्यांचे स्वच्छंद वादी व्यक्तिमत्त्व, ते स्वतःला कोणत्याही बंधनात अडकवून घेत नाहीत. आणि हेच त्यांच्या पात्रांतूनही दिसते. उदा. 'सती' या नाटकातील बाणेदार लक्ष्मी 'कोवळे दिवस' मधील राजा 'बनगरवाडी' मधील राजाराम इ.

माडगूळकरांचा विशेष अभ्यास करीत असताना त्यांचे समग्र साहित्य लेखन व चरित्रात्मक तपशील, त्याचप्रमाणे समकालीन स्थिती यांचा अभ्यास केल्यावर 'गावाकडच्या गोष्टी', 'कोवळे दिवस', 'सती', 'नागझिरा' ही पुस्तके त्यांच्या लेखनाचे व जीवनाचे चार टप्पे दिसतात. ग्रामीण जीवनाकडून चिंतनशीलतेकडे, विशिष्ट कटु अनुभवाकडून लेखन प्रक्रियेकडे, लेखनाकडून सादरीकरणाकडे, जनारण्याकडून वनारण्याकडे असे त्यांच्या जीवनाचे चार टप्पे त्यांच्या चार गद्य प्रकारातून दिसतात.

एकदंर, व्यंकटेश माडगूळकर स्वच्छंदवादी माणदेशी कलावंत म्हणून प्रकर्षाने जाणवतात. असं मराठी सारस्वतातील लखलखीत देशी लेणं ज्यांनी साहित्याच्या कक्षा रुंदावल्या असे माडगूळकर २८ ऑगस्ट २००१ साली काळाच्या 'पडद्याआड गेले.

**अरुणा विचारे**

हेमप्रभा, सुदर्शन कॉलनी,

कोपरी, ठाणे- (पू) : ४०० ६०३

दूरध्वनी : ५४३ ५३२८

OOO

# एकविसाव्या शतकात मराठीचे स्थान

इंग्रजीचे वर्चस्व वाढून मराठी बोलण्या-लिहिण्यावर तिचे परिणाम होताना आपणास पदोपदी जाणवतात. या पार्श्वभूमीवर काही विचार मांडणारा हा लेख.- संपादक

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये मराठी भाषेच्या स्थिती संबंधाने 'मराठी असे आमुची मायबोली, जरी आज ती राजभाषा नसे' ह्या शब्दात एका कवीने खंत व्यक्त केलेली आहे आणि ती योग्यच होती. कारण त्यावेळी आपल्या देशावर इंग्रजांची, म्हणजे परकियांची सत्ता होती. त्यामुळे त्यांची शैक्षणिक उद्दिष्टे, त्यांचा जो मायदेश - इंग्लंड, त्याच्या स्वार्थाशी निगडित होती. लॉर्ड मेकॉलने एतद्देशीय लोकांना इंग्रजी भाषेचे आणि तदनुषंगाने इतर विषयांचे इंग्रजी भाषेच्या माध्यमातून शिक्षण द्यावे, ह्या धोरणाची शिफारस केली, ती इंग्रजांचा येथील राज्यकारभार सुरळीत चालावा म्हणून, हातभार लावणारी कारकूनांची पलटण तयार व्हावी, ह्या उद्देशाने. आणि हे धोरण त्यांच्या दृष्टीने उचितच होते. त्यात काही गैर किंवा वावगे होते असे म्हणता येणार नाही. त्यांना इथल्या स्थानिक लोकभाषांचा विकास व्हावा ह्याची काळजी करण्याचे काही कारण नव्हते. त्यामुळे इंग्रजी शिकून अशी एक पिढी तयार झाली की जिला इंग्रजी भाषेबद्दल स्वभाषेपेक्षा जास्त प्रेम होते. इंग्रजी भाषेचा जास्त अभिमान होता. त्यामुळे पुढील सर्व पिढ्या ह्याच वैचारिक मुशीत घडत गेल्या. थोडक्यात, भारतीय पेहराव करणारी परंतु इंग्रजी भाषेचे आणि पर्यायाने इंग्रजांचे अंध ... करणारी एतद्देशीय इंग्रजांची एक पिढी तयार झाली.

परंतु अशा प्रकारचा परिणाम इंग्रजी भाषा आत्मसात केलेल्या सर्व व्यक्तींच्या बाबतीत झाला नाही. कारण काहींनी इंग्रजी भाषेचे अध्ययन केले, तिच्यावर प्रभुत्व संपादन केले. परंतु स्वभाषेबद्दलचा अभिमान यत्किंचितही कमी होऊ दिला नाही. ह्यामध्ये लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, शि. म. परांजपे, विष्णुशास्त्री चिपळूणकर इ. व्यक्तींचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. काँग्रेसच्या स्वातंत्र्य चळवळीची जी चतु:सूत्री होती त्यामध्ये 'राष्ट्रीय शिक्षण' हे एक सूत्र होते. आणि त्यामध्ये 'मातृभाषेतून शिक्षण' हे महत्त्वाचे विचारसूत्र होते. म. गांधींनी देखील मूलोद्योग शिक्षणाबरोबरच मातृभाषेतून शिक्षणाचा पुरस्कार केला. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी इंग्रजी भाषेला 'वाघिणीचे दूध' म्हणून गौरविले. मात्र स्वत: जे निबंधलेखन केले ते मराठीतून. उपहासगर्भ आणि वक्रोक्तीपूर्ण निबंध लिहून इंग्रजी राजवटीवर जळजळीत शब्दात प्रखर टीका केली आणि जनतेच्या मनात स्वदेशप्रीती निर्माण केली. लो. टिळकांनी आपल्या केसरीतून 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे का ?' या सारखे सरकारला हादरविणारे अग्रलेख लिहिले. 'गीतारहस्य' यासारखा श्रीमद्भगवतगीतेतील कर्मयोग विशद करणारा ग्रंथ मराठीतून लिहिला. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी तर मराठी भाषेच्या विकासाचा ध्यासच घेतला होता आणि तिच्या शुद्धीकरणाचे प्रयोग केले होते. शिवाय मॅझिनीचे चरित्र, १८५७ च्या स्वातंत्र्य समराचा इतिहास, माझी जन्मठेप सारखे आत्मचरित्र इ. विपुललेखन आपल्या सशक्त लेखणीने केले, ते मराठीतूनच.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये मराठी भाषेला ऊर्जितावस्था येईल आणि तिला तिचे उचित स्थान आणि महत्त्व प्राप्त होईल, अशी जर कोणी अटकळ बांधली असेल, तर त्यात वावगे असे काहीच नाही. पण आज

आपल्याला अखिल महाराष्ट्रामध्ये कोणते चित्र पहावयास सापडते ? कोणत्याही सुबुद्ध नागरिकाच्या अपेक्षेच्या विपरित दृश्य आपल्याला सर्वत्र दिसते. मराठी ही कागदोपत्री राजभाषा असली तरी राज्यकारभार, सर्व शासकीय आणि अशासकीय संस्थांचा कारभार मराठीतून चालताना दिसत नाही. त्यामुळेच कोर्टाचे कामकाज मराठीतून चालावे, न्यायाधीशांनी आपला निकाल मराठीतून द्यावा. ह्यासाठी आंदोलन करण्याची पाळी येते. कुठलाही शासकीय किंवा अशासकीय कामाशी संबंधित फॉर्म्स किंवा माहितीपत्रके मराठीतून उपलब्ध होत नाहीत. मराठी भाषेची उपेक्षा पालक-शिक्षक, शिक्षणसंस्था चालक, शासन सर्व स्तरावर चालू आहे. मराठी भाषा मातृभाषा म्हणून अध्ययनाच्या दृष्टीने सोपी ह्या गैरसमजूतीतून तिच्याकडे दुर्लक्ष केले जाते. इंग्रजी परकीय भाषा म्हणून आकलनाच्या दृष्टीने अवघड म्हणून तिच्याकडे उलट अधिक गांभीर्याने पाहिले जाते. अधिक परिश्रमपूर्वक तिचा अभ्यास केला जातो. या सर्वांचे मूळ आपल्या इंग्रजी भाषेबद्दलच्या मानसिकतेत आहे. इंग्रजी भाषेचे ज्ञान असणारी, फाड, फाड, अस्खलितपणे ओघवती इंग्रजी बोलू शकणारी व्यक्ती म्हणजे बुद्धिमान व्यक्ती असे चुकीचे समीकरण मांडण्यात येत आहे. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये इंग्रजी माध्यमातून शिक्षण देणाऱ्या शाळांचे जणू काही पेवच फुटले आहे. त्यामुळे मुंबईतील गिरगाव सारख्या बहुसंख्य मराठी भाषिक भागातीलसुद्धा मराठी माध्यमाच्या शाळा पुरेशा विद्यार्थी संख्येअभावी धडाधड बंद होत आहेत. हे कशाचे लक्षण आहे ? आकर्षक गणवेष घालणाऱ्या आणि जरा धीटपणे इंग्रजी बोलणाऱ्या चांगल्या शिष्टाचारांचे पालन करणाऱ्या मुलांकडे पाहून ज्यांच्या घरी इंग्रजीचे वातावरण नाही किंवा इंग्रजी भाषेची शैक्षणिक पार्श्वभूमी नाही, असे पालकसुद्धा आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालताना दिसतात. मग अशा मुलांची शैक्षणिक प्रगती तर होत नाहीच उलट त्यांची मानसिक, भावनिक कुचंबणा होते. इंग्रजी माध्यमात शिकणारी मुले मातृभाषेतून बोलत नाहीत, इंग्रजीतून बोलत नाहीत, तर हिंदीतून बोलताना आपल्याला आढळतात. त्यांच्या कुठल्याच भाषेचा विकास धड होत नाही. शासनाने देखील महाविद्यालयीन स्तरावर माहिती-तंत्रज्ञान ह्या विषयाला विकल्प म्हणून मराठी भाषेची निवड करावी. यापुरते मराठी भाषेचे दुर्दैव कोणते ? पहिलीपासून इंग्रजीच्या अध्ययनाची सक्ती शासनाकडून केली जाते. यामागे कोणते शैक्षणिक मानसशास्त्र आहे ? ही वैचारिक गुलामगिरीच नव्हे काय ?

वास्तविक स्वभाषेतूनच व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा परिपूर्ण आणि सहज विकास होत असतो. आपले विचार, कल्पना, भावना ह्यांचे प्रकटीकरण आपण आपल्या मातृभाषेतून जितक्या सहजपणे, उत्कटपणे आणि प्रभावीपणे करू शकतो तितक्या परिणामकारकतेने इंग्रजी सारख्या परकीय भाषेतून होणे शक्य नाही. 'आई' हा सहजोद्‌गार आहे, 'मम्मी' म्हणताना आतड्याला पीळ पडत नाही. नाना फडणीसांनी तोतयांच्या बंडाच्या वेळी तोतयाची मातृभाषा शोधून काढण्यासाठी त्याच गोष्टीचा खुबीने उपयोग केला होता. तोतयाला मराठी, हिंदी, उर्दू, फारसी वगैरे बऱ्याच भाषा अवगत होत्या. तोतया ज्या खोलीमध्ये झोपला होता, त्या खोलीच्या छताचे कौल काढून तोतयावर पाणी टाकण्याची व्यवस्था नानांनी केली होती. झोपेत अचानक अंगावर पाणी पडताच तोतया ओरडत उठला, तो स्वभाषेतच. नानांच्या ह्या नामी युक्तीने तोतयाचे बिंग उघडकीस आले. ही गोष्ट मातृभाषेच्या महत्त्वावर विदारक प्रकाश टाकते. मातृभाषेतून शिक्षण हेच खरे शिक्षण.

इंग्रजी भाषेच्या अध्ययन-अध्यापनाला माझा विरोध नाही. परंतु इंग्रजी माध्यमाचा अट्टाहास का ? इंग्रजी ही ज्ञानभाषा आहे. 'English is a window to world's knowledge' हे खरे आहे. इंग्रजी ही समृद्ध भाषा आहे. जगभर कित्येक शतके इंग्रजांचेच साम्राज्य असल्यामुळे इंग्रजी भाषेचा प्रचार आणि प्रसार झाला. विकास झाला.

सर्व विषयांवर इंग्रजीतून विपुल लेखन करण्यात आलेले आहे. त्यामुळे कुठल्याही ज्ञानशाखेतील विषयांवर विपुल अशी ग्रंथसंपदा इंग्रजीमध्ये उपलब्ध आहे. इंग्रजी ही जगाची संपर्क भाषा आहे. या सर्व गोष्टी निर्विक मान्य आहेत. यासाठी इंग्रजी भाषेचा अभ्यास अवश्य करावा. परंतु इंग्रजी माध्यमातून शिक्षण हे अनैसर्गिक आहे. ती भाषिक आणि वैचारिक विकृती आहे. रशिया, जर्मनी, चीन, जपान इ. देशांतून मातृभाषेचा रास्त अभिमान बाळगला जातो. आणि महाविद्यालयीन स्तरावर देखील मातृभाषा हेच शिक्षणाचे माध्यम असते. तरी देखील ही राष्ट्रे अमेरिका, फ्रान्स, इंग्लंड इ. पाश्चिमात्य विकसित देशांच्या तुलनेने कुठल्याही क्षेत्रामध्ये तसूभर देखील मागे नाहीत. कॉलेजला विज्ञान शाखेत प्रवेश मिळविण्यासाठी इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेणे आवश्यक आहे. अशातला भाग नाही. इ. ८ वी पासुन गणित-विज्ञान ह्या विषयांचे इंग्रजीतून अध्यापन हा तर अर्धवट आणि हास्यास्पद प्रकार आहे. सातवीपर्यंत मराठी माध्यमातून शिकलेल्या विद्यार्थ्यांचे इंग्रजीचे ज्ञान जुजबी असते. त्यांची शब्द संपत्ती (Vocabulary) समृद्ध नसते. त्यामुळे भाषिक अडचण, शिवाय विषयांच्या आकलनातील अडचण, अशा दोन आघाड्यांवर लढायला आपण विद्यार्थ्यांना भाग पाडतो. आणि 'ना घर का ना घाट का' अशी आपण त्यांची केविलवाणी अवस्था करून टाकतो. वास्तविक एस्. एस्. सी. नंतर महाविद्यालयीन स्तरावर विज्ञान शाखेमध्ये किंवा इतर कुठल्याही शाखेमध्ये शिकताना विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषिक अडचण येत नाही. कारण आता त्यांनी पुरेशी इंग्रजी भाषिक परिपक्वता प्राप्त केलेली असते.

मग एकविसाव्या शतकामध्ये मराठी भाषेचे भवितव्य काय ? ह्या संगणक युगामध्ये, अवकाश युगामध्ये भवितव्य काय ? माझ्या मते संस्कारभाषा म्हणून मराठी भाषेचे स्थान एकविसाव्या शतकामध्ये अनन्य साधारण रहाणार आहे. गृह शिक्षणामध्ये मातृभाषेचा वाटा मोलाचा असतो. मुलांच्या संवेदनक्षम मनावर जे संस्कार केले जातात. ते प्रामुख्याने घरातील व्यक्तींकडूनच. त्यामध्ये मातेला मुलांच्या संस्कार शिक्षणाच्या दृष्टीने बरेच महत्त्व आहे. आणि वाव आहे. मातृभाषेतून गाणी, गोष्टी, ह्या माध्यमातून मुलांच्या मनावर संस्कार करणे सहज शक्य आहे. मुलांशी इंग्रजी बोलण्याचा खटाटोप व लटपट करण्यापेक्षा मराठीतून बोलावे त्यालाही बोलावयास लावावे. रामायण-महाभारतातील कथा इ. संस्कारक्षम साहित्याचे वाचन करावयास लावावे. मराठी सिनेमा, मराठी नाटकं किंवा दूरदर्शन वरील मराठी कार्यक्रम पहाण्याचा आग्रह धरावा. शिक्षकांनी देखील विद्यार्थी मराठी भाषेचे लेखन, उच्चारण जास्तीत जास्त शुद्ध करील ह्याकडे लक्ष द्यावे. मराठी बोलताना अन्य भाषिक शब्दयोजना शक्यतो टाळावी. असा आग्रह धरावा. मराठी व्यतिरिक्त अन्य विषयांचे अध्यापन करण्याच्या शिक्षकांनी देखील आपले उच्चार, आपले फलकलेखन ह्याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे. मराठी हे आपले अध्यापनाचे माध्यम आहे. विद्यार्थ्यांची मराठी भाषा सुधारली. तर त्यांचे विज्ञान, इतिहास, भूगोल इ. अन्य विषय देखील आपोआप सुधारतील. 'माझा मराठीचि बोलु कौतुके। परी अमृतातेही पैजा जिंके। ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन॥' असा मराठीच्या सामर्थ्याबद्दल रास्त अभिमान बाळगणाऱ्या ज्ञानोबा माऊलींच्या मराठीला 'सोनियाचे दिवस' येतील असे आम्हांला खरोखरच मनापासून वाटतेय. हे सिद्ध करण्याची वेगळी गरज भासणार नाही.

श्री. प्रभाकर अरदकर
सहशिक्षक
श्रीरंग विद्यालय, ठाणे.

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

कुलगुरु डॉ. बी. पी. सावळे

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माननीय कुलगुरु डॉ. बी. पी. सावळे यांच्या पदवीदान समारंभातील भाषणामधील काही भाग येथे देत आहोत. मुक्त विद्यापीठाच्या या अहवालावरून कार्याची कल्पना येते. विद्यापीठाचे विभागीय संचालक प्रा. चंद्रकांत भोंजळ यांनी सदर भाषण उपलब्ध करून दिले त्याबद्दल त्यांचे दिशा तर्फे आभार.
- संपादक

आदरणीय कुलपती डॉ. अलेक्झांडर साहेब, प्रमुख पाहुणे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री माननीय खा. शरद पवार साहेब, व्यवस्थापन मंडळ, विद्वत् परिषद आणि नियोजन मंडळाचे सदस्य, विद्याशाखा संचालक, उपस्थित मान्यवर, विद्यापीठातील माझे सहकारी, स्नातक आणि बंधू-भगिनींनो, विद्यापीठाच्या आठव्या पदवीदान समारंभात मी आपले विद्यापीठाच्या वतीने हार्दिक स्वागत करतो.

आज पदव्या घेणाऱ्या स्नातकांचे आणि विशेष प्रावीण्य संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो आणि थोडक्यात विद्यापीठाच्या कार्याचा अहवाल आपल्यापुढे मांडतो. विद्यापीठाचा हा अहवाल इथल्या शिक्षक-शिक्षकेतर सहकाऱ्यांच्या परिश्रमाचा आणि मुंबईपासून गडचिरोलीपर्यंत अनेक शिक्षणतज्ज्ञ, प्राध्यापक आणि लोकसेवक या सर्वांच्या सामिलकीचा आणि सगळ्यांनी मिळून केलेल्या प्रयत्नांचा छोटासा आढावा आहे.

विद्यापीठाच्या शैक्षणिक कामगिरीचा पट आपल्यापुढे उभा राहावा यासाठी मी प्रारंभी थोडी संख्यात्मक स्वरुपात माहिती सांगतो. विद्यापीठाची संपूर्ण महाराष्ट्रात एकूण १,५०० अभ्यासकेंद्रे असून आतापर्यंत एकूण ५,९०,००० विद्यार्थ्यांनी या विद्यापीठातल्या विविध शिक्षणक्रमांचा लाभ घेतला आहे. गेल्या वर्षी १,१०,६८३ विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्रापासून पदव्युत्तर संशोधन पदवीपर्यंत लहान-मोठ्या ७५ विविध अभ्यासक्रमांसाठी या विद्यापीठात प्रवेश घेतला आहे. विद्यापीठाने आजपर्यंत २८६ अभ्यासक्रम विकसित केले असून एक हजार पाठ्यपुस्तकांची निर्मिती करणारे कदाचित हे पहिलेच विद्यापीठ असेल. मुद्रित पाठ्यपुस्तकांखेरीज २९८ श्रवणफिती आणि २१२ चित्रफितींच्या माध्यमांतून अमुद्रित अध्ययनसाहित्य निर्माण केले आहे. याखेरीज वेगवेगळ्या अभ्यासक्रमांसाठी सीडीरॉम, इंटरनेटच्या माध्यमातली 'पडद्यावरची शाळा' अर्थात 'व्हर्च्युअल क्लासरुम', तसेच दूरदर्शन आणि नभोवाणी यासारख्या अत्याधुनिक माध्यमांचा कल्पकतापूर्ण वापर करण्यात येत आहे. इंटरनेटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना माहिती पुरविणे, त्यांना स्वयंअभ्यासाची स्वतःच चाचणी घेण्याची सुविधा देणे, याबाबतीत विद्यापीठाने नवनवीन यशस्वी प्रयोग केले आहेत. मुंबईपासून गडचिरोलीपर्यंत महाराष्ट्रभर पसरलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सेवा पुरविण्यासाठी नेटवर्किंगचे एक शैक्षणिक जाळे प्रस्थापित करण्याचा कृतिकार्यक्रम विद्यापीठाच्या दहाव्या योजनेत पूर्ण करावयाचा आहे. विद्यापीठाच्या परीक्षाही ऑनलाईन घेण्यासाठी या नेटवर्कचा वापर करण्यात येणार आहे. सध्या निरनिराळ्या अभ्यासकेंद्रांवर सुमारे पाच हजार समंत्रक (Counsellor) विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात गुंतले आहेत. त्यांचं

प्रशिक्षण करण्याचंही काम या नेटवर्कच्या माध्यमातून केलं जाणार आहे. आज या पदवीदान समारंभातही जवळपास दहा हजाराच्यावर विद्यार्थी (उपस्थित वा अनुपस्थित) पदव्या आणि पदविका संपादित करीत आहेत.

गेल्या वर्षभरातल्या ठळक घटनांचा मी इथे निर्देश करू इच्छितो. 'कॉमन वेल्थ ऑफ लर्निंग' या जागतिक पातळीवरील संस्थेचा आपल्या देशातला पहिला 'क्वॉलिटी ऑफ लाईफ अॅवार्ड' मिळविण्याचा मान या विद्यापीठाला मिळाला आहे. सेवाभावी स्त्रियांच्या प्रशिक्षणातून गावोगावी अंगणवाडी सेविका आणि सेवाभावी स्त्री कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षणाच्या उपक्रमासाठी हा अॅवार्ड मिळाला आहे. अत्यंत अल्प उत्पन्न गटातील महिलांच्या बचतीला बँकांच्या पतपुरवठ्याची जोड देऊन प्रत्येक वाड्या-वस्तीत महिलांची उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी हा शिक्षणक्रमाचा उपयोग होणार आहे.

आपल्या देशाची अर्थव्यवस्था ही कृषिकेंद्री अर्थव्यवस्था आहे. राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा नेहमीच महत्त्वाचा राहिला आहे. त्यामुळे देशातली ७० टक्के लोकसंख्या कृषिकेंद्री रोजगारावर अवलंबून आहे. त्यामुळे देशाच्या शैक्षणिक नियोजनात सर्वात मोठा भर कृषि आणि कृषिप्रधान उद्योग-व्यावसायिकांचे प्रशिक्षण करण्यावर असायला हवा आहे. आपल्या देशात २९ राज्यस्तरीय कृषि विद्यापीठे आहेत, पण शेतकऱ्यांना त्यांच्या गरजांनुसार व शेतावर काम करता करता शिक्षण देणारे देशातील आपलं हे एकमेव मुक्त विद्यापीठ आहे. आपल्या विद्यापीठाने शासनाच्या कृषि विज्ञान केंद्राच्या योजनेची साथ मिळवून राज्यातल्या शेतकऱ्यांच्या शिक्षणाची एक चळवळ संघटित केली आहे. भारतीय कृषि अनुसंधान परिषद आणि नाबार्डच्या सहकार्याने कृषि माहिती व सल्ला केंद्रे स्थापून दरवर्षी १२,००० शेतकऱ्यांना कृषिक्षेत्रातील नवनवीन ज्ञानाची माहिती आणि सल्ला देण्याची योजना कार्यान्वित झाली आहे. फळबाग विकासाच्या कार्यक्रमापासून जैव-तंत्रज्ञानाच्या वापरापर्यंत शेतीच्या सर्व क्षेत्रात सल्ला देण्यासाठी प्रयोगशील शेतकऱ्यांची एक ज्ञानात्मक चळवळ उभी राहावी म्हणून विद्यापीठाने 'कृषि प्रयोग परिवारांची' स्थापना केली आहे. गेल्या वर्षी द्राक्षापासून रेडवाईन निर्मिती करण्याबाबत, कॉफीचे पीक घेण्याबाबत आणि जैव-तंत्रज्ञाच्या नव्या दिशा समजावून घेण्यासाठी या विद्यापीठाने प्रयोगशील शेतकरी आणि संशोधकांचे एकत्रित मेळावे आयोजित केले. मा. खासदार शरद पवार साहेबांनी या अभ्यास परिषदांना आवर्जून उपस्थित राहून शेतकऱ्यांना आणि अध्यापकांना मार्गदर्शन केले आहे, त्याचाही मी कृतज्ञतापूर्वक निर्देश करू इच्छितो. आता विद्यापीठाने कृषि शिक्षणाच्या सर्व अभ्यासकेंद्रांना संगणक आणि नेटवर्कच्या सुविधा पुरविल्या असून एक स्वतंत्र कृषि शिक्षणाचे नेटवर्क निर्माण केले आहे. शिक्षणशास्त्र आणि विज्ञान-तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अभ्यासक्रमासाठीही हे संगणकाचे नेटवर्क तयार झाले आहे. पुढे उपग्रह वाहिनीद्वारे विद्यापीठाला स्वतंत्रपणे प्रसारणसेवा निर्माण करण्यासाठी पुरेसे अर्थसाहाय्य झाले, तर हे विद्यापीठ दूरशिक्षणाच्या विस्ताराचा देशातच नव्हे तर संपूर्ण आशिया खंडात एक नमुनादर्श निर्माण करेल असा मला विश्वास वाटतो.

गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात ४,५०० चौ. मी. क्षेत्रफळाच्या आणि साडेतीन कोटी रुपयांची गुंतवणूक असलेल्या शैक्षणिक इमारतीचे उद्घाटन मा. राज्यपाल आणि विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. सी. अलेक्झांडर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या इमारतीमुळे विद्यापीठाच्या वाटचालीतला एक महत्त्वपूर्ण टप्पा पूर्ण झाला असून याप्रसंगी अन्य मान्यवरांबरोबरच आजचे आपले प्रमुख पाहुणे मा. शरदरावजी पवार साहेबही आग्रहाने उपस्थित होते. मा. कुलपती महोदय आणि मा. पवार साहेब यांच्या या विद्यापीठावरील प्रेमाचा आणि सौहार्दपूर्ण लोभाचा क्षण म्हणून मी या घटनेचा येथे

कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतो.

नजिकच्या काळात विद्यापीठाने काही संकल्प केले आहेत, त्यांची मी आपल्याला थोडक्यात कल्पना देतो. पंचायतराज व्यवस्थेतील तीन लाखांहून अधिक लोकप्रतिनिधी आणि ग्रामसेवकांच्या प्रशिक्षणाचा कार्यक्रमही हाती घ्यावयाचा आहे. राज्य शासनाचा आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांचा पाठिंबा मिळाला तर राज्यातील २७,००० हून अधिक ग्रामपंचायतींच्या कार्यक्रमात ग्रामीण विकासाचे प्रशिक्षण करण्याचा क्रांतिकारी कार्यक्रम हे विद्यापीठ पूर्ण करू शकेल.

'सहकारातून विकास' ही महाराष्ट्राची फार मोठी ताकद आहे. बदलत्या जागतिक संदर्भात सहकाराचे मूल्य रुजवून त्याची नवी कार्यसंस्कृती घडविण्यासाठी सहकार क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या मनुष्यबळाचे प्रशिक्षण करण्याची गरज आहे. त्या दृष्टीने 'सहकार व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम' विकसित करण्याचे काम सुरु केले असून लवकरच तो कार्यान्वित होईल. या उपक्रमासाठी राज्य शासन आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सहकार्य मिळविण्यात आले आहे.

लातूर भूकंपाच्या आपत्तीच्या पार्श्वभूमीवर नैसर्गिक संकटाचा मुकाबला करण्यासाठी नियोजन, धैर्य आणि परस्पर सहकार्याचा एक चांगला नमुनादर्श मा. शरदरावजी पवारांच्या नेतृत्वाखाली निर्माण झाला आहे. आता राष्ट्रीय पातळीवर आपत्कालीन व्यवस्थापनाच्या संदर्भात देशाला मार्गदर्शन करण्याची जबाबदारी पवार साहेबांच्यावर सोपविण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर पवार साहेबांच्या मार्गदर्शनाचे आपल्या विद्यापीठात आपत्कालीन व्यवस्थापन केंद्र स्थापन करून नागरिक, प्रशासक, इंजिनीयर्स, डॉक्टर आणि स्वयंसेवी संस्थांतील कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण करण्याची जबाबदारी निभावण्याचा आपण संकल्प केला आहे. दुष्काळ, अतिवृष्टी, साथीचे रोग, आग, मनुष्यनिर्मित दंगली, दहशतवाद, इत्यादी तेरा प्रकारच्या आपत्कालीन परिस्थितीशी सामना करण्याची तंत्रे, कौशल्ये आणि मानवी शहाणपणाचा वापर वाढविण्यावर या शिक्षणक्रमांतून भर दिला जाणार आहे.

नजिकच्या काळात मुक्त शिक्षणाच्या प्रसारासाठी माहिती तंत्रज्ञान आणि संप्रेषण तंत्र प्रणालीचा मोठ्या प्रमाणात वापर करण्याचा विद्यापीठाचा संकल्प आहे. संपूर्ण महाराष्ट्रात इंटरनेटच्या साहाय्याने मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्रांचे एक विशाल शैक्षणिक जाळे निर्माण करण्यात येईल. इंटरनेटच्या माध्यमातून 'वेब बेस्ड इन्स्ट्रक्शन' ही स्वतंत्र अध्ययनप्रणाली विकसित करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना या महाजालाच्या मार्फत थेट मार्गदर्शन केले जाईल. प्रवेशापासून परीक्षेपर्यंतच्या सर्व शैक्षणिक सेवा या नेटवर्कच्या माध्यमांतून पुरविण्यात येतील. इ-मेल द्वारे विद्यार्थ्यांना आपल्या शंका निरसनाची सुविधा देण्यात येईल. संगणकावरील 'व्हर्च्युअल क्लासरुम' बरोबरच दूरदर्शनवरुन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी दृक्-श्राव्य स्वरुपाच्या टेलिकॉन्फरन्सिंगची सुविधा उपलब्ध करण्याचा कार्यक्रम या दहाव्या योजनेत विद्यापीठ पूर्ण करणार आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने राष्ट्रीय पातळीवर विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षणाची गुणवत्ता निर्धारित करण्यासाठी 'राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद (NAAC)' या संस्थेची बंगलोर येथे स्थापना केली आहे. दूरशिक्षण परिषदेने आपल्या विद्यापीठाच्या सहकार्यानेच मुक्त विद्यापीठे आणि दूरशिक्षण संस्थांच्या गुणवत्ता निर्धारणाचे निकष तयार केले आहेत. आज 'जागतिक व्यापार संघटना' (WTO) सारख्या संघटनेच्या करारमदारांमुळे शिक्षण हे सेवाक्षेत्र म्हणून घोषित झाले असून आंतरराष्ट्रीय पातळीवर विद्यापीठांना शैक्षणिक स्पर्धेला तोंड द्यावे लागणार आहे. आपल्या विद्यापीठाने


या दृष्टीने गुणवत्ता संवर्धनासाठी स्वतंत्र 'गुणवत्ता आश्वासन केंद्र' निर्माण केले असून लवकरच 'राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद (NAAC) मार्फत विद्यापीठाचे मूल्यमापन आपण करून घेणार आहोत. मुक्त शिक्षणाच्या गुणवत्तेचा मानदंड निर्माण करणारे विद्यापीठ म्हणून आपली प्रतिमा निर्माण करण्याचा संकल्प आपण सोडला आहे.

मुक्त विद्यापीठ आपले स्वत:चे शैक्षणिक तत्त्वज्ञान घडवीत आहे. राज्यातील रोजगाराच्या गरजा आणि आर्थिक प्रगती यांना पोषक ठरणारे शिक्षण हा या तत्त्वज्ञानाचा एक ध्रुव असून महाराष्ट्राची वैचारिक बांधणी करणे, लोकशाही मूल्यांवर आधारलेला विवेकाधिष्ठित आचारधर्म रुजविणे हा या तत्त्वज्ञानाचा दुसरा ध्रुव आहे. अभिरुचिसंपन्न, प्रगत विचारांचा समृद्ध महाराष्ट्र घडविण्याचे मा. यशवंतरावजींचे स्वप्न साकार करण्यासाठी हे विद्यापीठ आपला कृतिकार्यक्रम घेऊन पुढे जात आहे. ही ज्ञानाची पालखी वाहण्यासाठी समाजातल्या सर्व स्तरातील शिक्षणप्रेमी नागरिकांनी सहकार्य करावे, असे नम्र आवाहन मी या प्रसंगी करतो.

विद्यार्थीजनहो, आपण सर्व राष्ट्राच्या नवनिर्माणाचे आधारस्तंभ आहात. नोकरी-धंदा, व्यवसाय आणि गृहकर्तव्य सांभाळून आपल्यापैकी अनेकांनी हे यश संपादित केलं आहे. इतर विद्यापीठातल्या विद्यार्थ्यांपेक्षा तुमच्या यशाचं म्हणूनच आम्हा सर्वांना विशेष कौतुक आहे. आपण ह्या दीक्षान्त समारंभातून एक नवी प्रेरणा, नवे ध्येय घेऊन जाणार आहात. आपलं जीवन चारित्र्यसंपन्न होईल, कुठल्याही लोभाला, भ्रष्टाचाराला, फंद-फितुरीला आपण बळी पडणार नाहीत याची प्रतिज्ञा आपण करा. आपलं रोजचं जगणं साधं, सुंदर, अहिंसक, प्रेममूलक, सर्वांना जोडणारं होईल आणि कधीही आपल्यापासून कुणी दुखावणार नाही याची काळजी घेण्याची शपथ घ्या. मुख्य म्हणजे सर्वांच्या सुखात माझे सुख आहे, सर्वांच्या स्वातंत्र्यात माझे स्वातंत्र्य आहे, सर्वांच्या समृद्धीत माझी समृद्धी आहे, सर्वांच्या शांतीत माझी शांती आहे हा मंत्र जपा. इतरांच्या हक्कांचे संरक्षण केल्यानेच माझ्या हक्कांचे संरक्षण होणार आहे, इतरांवर अन्याय केला नाही तरच मला न्याय मिळणार आहे, इतरांवर प्रेम केले तरच माझ्यावर कुणी प्रेम करणार आहे, कामाच्या ठिकाणी निष्ठापूर्वक काम अध्ययनशील समाजाची रचना करण्यात आपले योगदान देण्याचा संकल्प करा. तुमचं जीवन निश्चितच उज्ज्वल आणि समृद्ध होईल. तुमच्या भावी वाटचालीस माझ्या हार्दिक शुभेच्छा!

विद्यापीठाच्या आठव्या
पदवीदान समारंभातील भाषणावरून

OOO



'पुस्तके' हा प्रतिभावंत आत्म्याचा श्वास आहे/असतो. त्यांच्यामुळे मन व जीवन समृद्ध होते. वाचनालये हा आपल्या संस्कृतीचा आधारस्तंभ आहे. साहित्यिकाची स्वप्ने या ग्रंथाच्या पानातून व्यक्त झालेली असतात. ग्रंथवाचनाची नशा ही वेगळीच असते. ती आयुष्यभर उतरत नाही. विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासक्रमातील पुस्तके शिकविण्यापेक्षा शिक्षकांनी विद्यार्थ्यांना त्या पुस्तकांच्या आत्म्याजवळ घेऊन जावे. आज ग्रंथालये, चिंतन, लेखक-वाचक यांच्या सख्येत वाढ झालेली असली तरी ग्रंथांचे चिंतन व मनन होत नसल्याने आम्ही रानटी संस्कृतीकडे वळलो आहोत.

# परिसर वार्ता

महाविद्यालयाच्या परिसरात सध्या खूप काही घडतंय ! अनेक शैक्षणिक, शिक्षणेतर सांस्कृतिक कार्यक्रमांची भाऊगर्दी, विविध समित्यांच्या मिटींग्स् व त्या निमित्ताने आखले जाणारे बेत, बार कोड असणाऱ्या ओळखपत्रांसाठी फोटो सेशन्सची गडबड, असं खूप काही जुलै महिन्यात घडत राहिलं. अकरावीच्या प्रवेशाच्या गर्दीत अकरावीचे वर्ग कधी सुरू झाले ते कळू नये, इतक्या वेगाने वर्ष सुरु झालं. अकरावीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. याच दरम्यान काही महत्त्वाचे कार्यक्रम महाविद्यालय परिसरात झाले.

त्यातील एक म्हणजे संख्याशास्त्र मंडळ अर्थात 'स्टॅटिस्टीक्स क्लबचे' उद्घाटन. आमच्या तंत्रनिकेतनाच्या ए. व्ही. हॉल मध्ये झालेल्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध संख्याशास्त्र तज्ज्ञ डॉ. शरद बर्वे उपस्थित होते. डॉ. शरद बर्वे राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक संस्थांशी जवळून संबंधित आहेत. मुंबई विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत सहाव्या क्रमांक मिळविणाऱ्या संख्याशास्त्र विषयातील आमचा विद्यार्थी संदीप सावंत याच्या गौरवार्थ आयोजित केलेल्या कार्यक्रमात यावर्षीच्या उपक्रमांचे औपचारिक उद्घाटनही करण्यात आले. संख्याशास्त्र या विषयाचे प्राथमिक ज्ञान असणे आजच्या काळात किती गरजेचे आहे हे सांगून सदर विषयाच्या उपयोजनाबद्दल आपली निरीक्षणे डॉ. बर्वे यांनी आपल्या भाषणात नोंदवली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्याप्रसारक मंडळाचे माननीय अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर होते. तसेच व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य सी. जी. पाटील, उपप्राचार्य डॉ. सौ. माधुरी पेजावर, संख्याशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. अशोक पाटील व संदीप सावंत उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अशोक पाटील यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. कल्पना फळ यांनी केले. प्रगत अभ्यास संस्थेचे संचालक डॉ. जी. व्ही. कुलकर्णी ही कार्यक्रमास आवर्जून उपस्थित होते.




स्टॅटिस्टिक्स क्लबच्या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. वा. ना. बेडेकर. डावीकडून बसलेले - प्रा. अशोक पाटील, डॉ. बर्वे, प्राचार्य सी. पी. पाटील, डॉ. सौ. पेजावर व संदीप सावंत.

### कला वाणिज्य महाविद्यालय वाङ्मय मंडळाचे उद्‌घाटन -

जीवन जगताना येणाऱ्या अनुभवातून जी कविता जन्म घेते तीच खरी कविता असते, असे उद्‌गार ख्यातनाम कवी नारायण सुर्वे यांनी काढले. जोशी-बेडेकर कला वाणिज्य महाविद्यालयातील मराठी वाङ्मय मंडळाचे उद्‌घाटन कवी नारायण सुर्वे यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य सदाशिव गोखले होते. दीपप्रज्वलन करून हे प्रातिनिधिक उद्‌घाटन करण्यात आले. व्यासपीठावर प्राध्यापक दामोदर मोरे, उपप्राचार्य अशोक वडगुजर, प्राध्यापिका अनघा देशपांडे आदी मान्यवर उपस्थित होते.



ठाण्यातील जोशी बेडेकर महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या वाङ्मय मंडळाच्या उद्‌घाटन सोहळ्यात बोलतांना कविवर्य नारायण सुर्वे. सोबत प्राचार्य सदाशिव गोखले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना यावेळी नारायण सुर्वे म्हणाले की, समाजाच्या प्रवाहात जे अनुभव येतात तेच माणसाला समृद्ध करीत असतात. येणाऱ्या संकटांना तोंड देण्यास ते शिकवितात. अनुभवातून येणारे शब्दच काळाच्या ओघात टिकून राहतात. त्या शब्दांचे निर्माते वर्षानुवर्षे जनमानसावर राज्य करतात. असे सांगून नारायण सुर्वे पुढे म्हणाले जोपर्यंत तरुण पिढी वाचनाकडे पाठ फिरवीत नाही तोपर्यंत मराठी भाषेची काळजी करण्याची गरज नाही. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी वाङ्मय मंडळाची नितांत गरज असल्याचे प्राचार्य सदाशिव गोखले यांनी सांगितले. आजच्या कार्यक्रमाला मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रतिसादावरून आजच्या विद्यार्थ्यांना अजूनही लेखक कवींबद्दल उत्सुकता आहे हे स्पष्ट होते. या उत्सुकतेला योग्य दिशा देण्यासाठी यासारखेच अनेक उपक्रम राबविले जाणार आहेत. असेही प्राचार्य सदाशिव गोखले यांनी स्पष्ट केले. मराठी विभागाचे प्रमुख प्राध्यापक दामोदर मोरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर प्रा. संतोष राणे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### बी. लिब् ची सुरुवात

मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र पदवी परीक्षेचे वर्ग आमच्या कला वाणिज्य महाविद्यालयात चालविले जातात. यंदाचे या वर्गाचे तिसरे वर्ष आहे. वर्गाचे अनौपचारिक उद्‌घाटन प्राचार्य सदाशिव गोखले यांनी केलेल्या स्वागतपर भाषणाने झाले. यावेळी वर्गसंयोजक प्रा. नारायण बारसे, प्रा. मोहन पाठक यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

### योग वर्गाची सुरुवात

कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांमधील कला मंडळातर्फे अंबिका योग कुटीरच्या साहाय्याने चालविल्या जाणाऱ्या योगासनांच्या वर्गांची सुरुवात जुलै महिन्यात झाली. विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व घटक संस्थांतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांना या वर्गाचा लाभ घेता येतो.

यंदाच्या दोन तुकड्यांच्या अनौपचारिक उद्‌घाटन अंबिका योग कुटीरचे कार्यवाह श्री. सुर्वेजी यांच्या हस्ते

झाले. या प्रसंगी प्रा. अनघा देशपांडे डॉ. आर. पी. आठल्ये, उपप्राचार्य मकरंद दीक्षित, सौ. दीक्षित, प्रा. बहेल उपस्थित होते.

**माजी विद्यार्थी संघ -**

महाविद्यालय परिसरातील कला वाणिज्य महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचा संघ सुरु करण्याच्या दृष्टीने प्राथमिक सभा गुरुपौर्णिमेच्या दिवशी थोरले बाजीराव सभागृहात झाली. याप्रसंगी विविध क्षेत्रात कार्यरत असणारे अनेक माजी विद्यार्थी उपस्थित होते. प्राचार्य गोखले सरांनी या सभेस मार्गदर्शन केले. माझी विद्यार्थ्यांनीही मनोगत व्यक्त केले.

**'दिशा' व्यासपीठ -**

दिशा मासिकाच्या 'दिशा' व्यासपीठाची सुरुवात शनिवारी वीस जुलै रोजी थोरले बाजीराव पेशवे सभागृहात झालेल्या श्री. र. कृ. जोशी यांचा व्याख्यानाने झाली. भाषा लिपी व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर बोलताना र. कृ. जोशी म्हणाले, भाषेला मौखिक व लिखित अशी दोन अंगे असतात, त्यामुळे अर्थ प्राप्ती होते. तामिळ भाषेत स्वरांना आत्मा व व्यंजनांना शरीर म्हटले आहे. त्यांनी स्वर व व्यंजनांच्या एकत्री करणातून अक्षरांची कशी निर्मिती होते ते सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी केले. ते म्हणाले, ''भाषेच्या वापरात आवश्यक असणाऱ्या परिभाषांची निर्मिती आपण करू शकलेलो नाहीत त्यामुळे भाषा विकास व अभ्यासावर परिणाम झाला'' कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर होते. आपल्या अध्यक्षीय समारोपच्या भाषणात त्यांनी या विषयांचे महत्त्व किती आहे हा मुद्दा मांडला. मंडळाचे उपाध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर यांनी आभार प्रदर्शन केले.

दिशा व्यासपीठातर्फे अशा प्रकारच्या वैचारिक व्याख्यानांचे आयोजन करण्यात येणार आहे.

**पुस्तक प्रकाशन -**

'युनिट ऑपरेशन्स आणि युनिट प्रोसेसेस' या पुस्तकाचे प्रकाशन शनिवार दि. २०-७-२००२ या दिवशी झाले. विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाचे प्राचार्य सी. श्री. मुजुमदार, हे या पुस्तकाचे लेखक आहेत.

विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या हस्ते प्रकाशन झाले. पुस्तकाचे आकर्षक मुखपृष्ठ व पटकन चाळावेसे वाटेल असे हे पुस्तक आहे असे उद्‌गार डॉ. वा.ना. बेडेकर यांनी या प्रसंगी काढले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सौ. गीतांली इंगवले यांनी केले. या समारंभास पुणे विद्यार्थी गृह प्रकाशनाचे श्री. शेटे हे उपस्थित राहिले होते. त्यावेळी त्यांनी या पुस्तकासंबंधी चार शब्द व्यक्त केले.

प्राचार्य मुजुमदार यांनीही मराठीत पुस्तक का लिहिले यासंबंधी सांगितले व हे पुस्तक आ. टी. आय. बेसिक ट्रेनिंग सेंटर तसेच केमिकल प्लॅन्टमधील शिकावू उमेदवारांना कसे उपयुक्त आहे याचे विवेचन केले.

या पुस्तकात एका भागात रासायनिक कारखान्यातील ऑपरेटस्‌ची भूमिका, युनिट ऑपरेशन्स व दुसऱ्या भागात युनिट प्रोसेसेस असे समाविष्ट केलेले आहे. या समारंभास वि. प्र. मंडळाचे उपाध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर, तंत्रनिकेतनाचे उपप्राचार्य प्रा. डी. के. नायक




विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर 'युनिट ऑपरेशन्स आणि युनिट प्रोसेसेस्' या पुस्तकाचे प्रकाशन करताना. सोबत प्राचार्य सी. श्री. मुजुमदार, तंत्रनिकेतन, ठाणे.

तसेच BTC चे विद्यार्थी व शिक्षक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

औद्योगिक प्रशिक्षण संस्था व कारखान्यातील प्रशिक्षण केंद्रे यामधील शिकाऊ उमेदवारांना मातृभाषेत विषय कळण्याच्या दृष्टीने सोपा जावा यासाठी हे पुस्तक उत्तम मार्गदर्शक ठरेल याची खात्री आहे.

**प्रा. मोहन पाठक**

## उद्यान विद्याशास्त्राच्या अभ्यासक्रमाची ठाणे महाविद्यालयात सुरुवात

बदलत्या परिस्थितीने हळूहळू पर्यावरण व निसर्गाकडे वळणाऱ्या शहरवासियांना वृक्ष, वनस्पती, बागा यांचे महत्त्व वाटू लागले आहे. म्हणूनच उद्यानविद्याशास्त्र (Horticulture) या विषयाचे पूर्वी मर्यादित असलेले क्षेत्र आता विस्तारू लागले आहे. या क्षेत्रामध्ये हजारो रोजगार निर्माण होत आहेत. यास्तव विद्यार्थ्यांना व्यवसायाभिमुख शिक्षण देऊन त्यांना जीवनात यशस्वी करण्याच्या उद्देशाने 'प्रगत अभ्यास केंद्र' (Advanced Study Centre) तर्फे बागकामशास्त्र/उद्यानविद्या शास्त्राच्या अत्याधुनिक अभ्यासक्रमाची सुरुवात या शैक्षणिक वर्षापासून होत आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाने परिपूर्ण असलेल्या या नऊ महिन्यांच्या पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमास वनस्पतिशास्त्र विषयाचा पदवीधारक अथवा वनस्पतिशास्त्र हा विषय द्वितीय वर्ष पदवीसाठी शिकलेला विद्यार्थी प्रवेश घेऊ शकेल.

महाराष्ट्र राज्यात विविध प्रकारचे हवामान, जमिन यामध्ये अनेकविध प्रकारची पिके व बागा मोठ्या प्रमाणावर होतात. बहुतांश महाराष्ट्र आजही शेतीजन्य उत्पन्नावरच अवलंबून आहे. स्वयंरोजगार तसेच आपल्यासारख्या विकसनशील देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी शेती हा ही एक उद्योग बनविण्याची आवश्यकता आहे. शासनाने अनेकविध योजनांच्या माध्यमातून बेरोजगार युवकांना रोजगार हमी अंतर्गत विविध उद्यानांच्या निर्मितीवर भर दिला आहे.

विद्या प्रसारक मंडळाच्या उपरिनिर्दिष्ट अभ्यासक्रमात विविध विषयांचा अंतर्भाव केलेला आहे. त्या अनेक विषयांपैकी कोणत्याही विषयासंदर्भात सहजपणे स्वयंरोजगार उपलब्ध होऊ शकतो हेच या पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाचे वैशिष्ट आहे. उद्यानविद्याशास्त्र अभ्यासक्रमात फळबागांच्या संदर्भात महत्त्वाचा फळांच्या लागवडी संदर्भातील प्रशिक्षण, विविध भाजीपाल्यांची लागवड, विविध प्रकारच्या फुलांचे किफायतशीर पीक घेणे ह्या सर्व विषयांचा निसर्गसंवर्धनाबरोबरच व्यावहारिक दृष्ट्या किफायतशीर उद्योगामध्ये यशस्वी परिवर्तन

करण्याचे प्रशिक्षण दिले जाईल.

विविध मसाल्याचे पदार्थ, औषधी वनस्पती तसेच सुगंधी वनस्पतींच्या लागवडीतून उत्तम फायदा होऊ शकतो.

पीक घेतल्यानंतरच्या व्यवस्थापना अंतर्गत फळे पिकवणे, त्याचप्रमाणे उद्यानाची रचना, घरगुती शाळातील शहरातील आणि राष्ट्रीय उद्याने, हिरवळ, शिवाय औद्योगिक उद्याने अशा अनेक विषयांचा समावेश या अभ्यासक्रमास आहे.

हरितगृह उतिसंवर्धन या अत्यंत आधुनिक तंत्रज्ञानाचाही समावेश आहे. विविध वृक्ष वाटिकांना, अन्नप्रक्रिया उद्योगांना भेट, विविध अन्न तयार करणे व अन्नाची साठवणूक आणि वृक्षसंवर्धनाचे प्रात्यक्षिक यांचे मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या अभ्यासक्रमातील पदविका प्राप्त विद्यार्थी स्वयंरोजगार मिळवू शकेल, तसेच फार्म-हाउसेसमध्ये प्रकल्प उभा करून उत्पादकता वाढविणे अथवा स्वतःचा असा वेगळा ठसा निर्माण करून शकेल.

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील वनस्पतिशास्त्र विभागातील प्रपाठक प्रा. डॉ. नागेश टेकाळे हे या अभ्यासक्रमाचे संयोजक म्हणून काम पहाणार आहेत.

या संदर्भातील अधिक माहितीसाठी बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे माजी प्राचार्य आणि 'प्रगत अभ्यास केंद्राचे' कार्यकारी संचालक प्रा. डॉ. जी. व्ही. कुलकर्णी यांचेशी संपर्क साधावा. **(दूरध्वनी क्र. ५३३ ९८७१)**

**प्रा. विद्याधर वालावलकर**

## जोशी-बेडेकरमधील माजी विद्यार्थ्यांचे संमेलन

'मोगरा फुलला....., इवलेसे रोप लावियले दारी..., वेलू गेला गगनावरी.... ' संत ज्ञानेश्वरांच्या अभंगांचे सूर प्रख्यात गायिका मृदुला दाढे-जोशी यांच्या तोंडून ऐकताना महाविद्यालयाच्या प्रगतीचा आलेख डोळ्यांसमोरून सरकत होता. निमित्त होते, ठाण्याच्या जोशी-बेडेकर कला-वाणिज्य महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांच्या संमेलनाचे.

गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून जोशी-बेडेकर महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांचे एक संमेलन भरवण्यात आले होते. महाविद्यालयातून शिक्षण घेऊन समाजात विविध स्तरावर वावरणारे माजी विद्यार्थी पुन्हा एकदा त्यांचे कॉलेज लाईफ आठवत कॉलेजमध्ये जमले होते. महाविद्यालयात आंदोलन करता करता लोकप्रतिनिधी बनलेले संदीप लेले, नजीब मुल्ला, गोपाळ लांडगे, सुधाकर चव्हाण, कृष्णकुमार कोळी, नाट्यक्षेत्रात कार्यरत असणारे एकनाथ शिंदे, गायिका मृदुला दाढे-जोशी, मोहन पाठक यांच्यासह अनेक जण कॉलेजमध्ये पुन्हा एकदा जमले होते. त्यांच्याबरोबर विविध क्षेत्रात कार्यरत असणारे दोनशेहून अधिक माजी विद्यार्थी वेळात वेळ काढून महाविद्यालयाच्या आठवणींना उजळणी देत एकत्र जमले होते. प्राचार्य स. वा. गोखले, उपप्राचार्य बडगुजर, यांच्यासह सर्व प्राध्यापक यावेळी उपस्थित होते. माजी विद्यार्थ्यांचा संघ स्थापन करण्यामागची संकल्पना गोखले सरांनी यावेळी विशद केली.

**प्रा. मोहन पाठक**

# खरंच सांगतो, ती वाचन-उत्सुक
# गोड मुलं आहेत !

माझ्या प्रिय पालकांनो,
शिक्षक सहकाऱ्यांनो,
आणि पुस्तकवेड्या ग्रंथपालांनो,
आता शिकवा मुलांना महत्त्व पुस्तकांच,
पुस्तकांच्या वाचनाचं.
जे जीवनाला आकार देतं
आणि बहुश्रुत करतं,
विचार करायला शिकवतं तेच खरं वाचन हे
ध्यानात आणून द्या त्यांच्या.
नुसतं पोथीनिष्ठ करू नका मुलांना
आणि करूनही घेऊ नका केवळ पोपटपंची !
होऊ द्या जाणीव त्यांना 'गावगाड्याची'
आणि 'गावगाड्याबाहेरच्या' आयुष्याची.
बेबी कांबळेचं जिणं त्यांना समजायला हवं,
तसंच 'उपरा' असणं म्हणजे काय असतं
ते ही कळायला हवं.
'बलुतं' दारीची वणवण बोचली पाहिजे त्यांच्या
खोल आतवर 'आठवणीतल्या पक्ष्यांसारखी'
आणि माणसं कळायला हवीत रस्त्यारस्त्यावरची.
'कोसबाडच्या टेकड्या' त्यांना चढायला शिकवा.
आणि शिकवा त्यांना की आदिवासी समजून
घेताना दमायला होत नसतं तर
त्यातून 'जेव्हा माणूस जागा होतो'
तेव्हा या जागा झालेल्या माणूसपणामुळेच
'माता नर्मदा' ही समजते आणि समजतं
'भारतीय स्त्रीजीवन' व दिसू लागतात
'स्त्री-संघर्षांची नवी रुपे.
या नव्या रुपातच त्यांना जेव्हा भेटेल एखाद्या
'अरुणाची गोष्ट.'
तेव्हा 'इच्छा नसताना' ही कसं वागायचं ते
आपसूक मनात उतरेल त्यांच्या.
उतरलं जाईल 'निरामय कामजीवन'
तेव्हा 'एड्सचे दुष्परिणाम' सांगायची
वेळच येणार नाही आपल्यावर.
'वैद्यकसत्तेतला' 'क्लोरोफॉर्म' त्यांना गुंगी आणेल
अथवा 'कॅन्सरची कहाणी' वाचून
'लाखमोलाचा जीव' कसा वाचवावा
म्हणून ते भयभीत होतील. पण त्यांना द्या समजावून की
संगीता बझेसारखी तरुणी
ही 'कॅन्सरची यात्रा' करून 'कॅन्सरची झुंज'
देऊन आली आहे.
'उंच माणसांच्या बेटांवरचे' हे केवळ अपघात
असतात,
हे ही सांगा त्यांना पुस्तकं दाखवून.
नेहमीच त्यांनी आपल्या 'अवतीभोवती'
बघायला शिकलं पाहिजे असं वाटत
असेल तर,
'जगावेगळं जग' पाहायला शिकवा त्यांना
'इदं न मम' चा मंत्रघोष आत्मसात
करायला सांगा.
'हमाल पंचायत' ते जेव्हा वाचतील तेव्हाच
ते टाकून देतील पाठीवरचा लाजेचा बोजा दूरवर
आणि उतरतील 'नरक सफाईच्या कार्यात.
त्यांना स्वच्छ सांगा की प्रत्येकाने
'कार्यरत', व्हायलाच पाहिजे असं नसतं.
'संकल्प' वाचूनही घेतं भान चळवळीचं.
फक्त त्यासाठी 'विमुक्तायन' ही

वाचायला लागतं.
'तराळ अंतराळात' शिरून तळमळीनं.
या तळमळीतून ते 'कोणाची जात चोरायला'
लावण्याचं पातक करणार नाहीत.
'मजल दरमजल' करत त्यांच्या जीवनाचा प्रवास
होईल केवळ फक्त त्यांचाच, वाचन
नावाचा 'माझा प्रवास'
तेव्हा त्या प्रवासातच त्यांना कधी भेटेल 'तोत्तोचान'
तर कधी 'पश्चिमेचे पुत्र'
तर कधी 'सिसिफस' ची तीव्रवेणी धडपड.
'सारे प्रवासी घडीचे' हे ही त्यांना कळेल त्यातूनच,
आणि जेव्हा ते तुडवतील, 'कथांच्या पाऊलवाटा'
तेव्हा त्यांना 'पाडस' मधल्या मुलाचा
कलासक्तपणा ही शिकवायला हवा.
तसं त्यांनी स्वीकारायला हवं 'जंगलाचं देणं.'
'कोवळी उन्हे' जशी त्याच्या अंगावर पडायला हवीत,
तसं 'व्यक्ती आणि वल्ली' वाचून खळखळून
हसायला हवं त्यांनी.
वंदिचा 'महाराष्ट्र' वाचून
खरा इतिहास स्फुरण पावून वाहायला हवा
तसं 'गतशतक शोधता शोधता'
'समाज स्पंदने' ही कळायला हवीत
त्यांना एकोणिसाव्या शतकातली.
फुले, आंबेडकर वाचून त्यांच्या आयुष्याचं चरित्र
निर्माण करायला जसं ते शिकतील,
तसंच ते शिकतील 'वडीलधाऱ्या' माणसांचा
आदर करायला.
माझ्या प्रिय पालकांनो,
शिक्षकांनो आणि ग्रंथपालांनो,
द्या त्यांना नजर विज्ञानाच्या दृष्टीची
तेव्हाच त्यांचं नातं जडेल आकाशाशी
आणि मातीशी ही.
अपयशातून होतात अंधश्रद्धेचे बळी
म्हणून कडक नजर ठेवा त्यांच्या वाचनावर
त्यांना आवर्जून सांगा -
कथा-कादंबऱ्या नसतात केवळ मनोरंजनासाठी,
तर त्या असतात.
जीवनातले संघर्ष समजून घेण्यासाठी.
माणसामाणसांतले संबंध उकलून दाखविण्यासाठी.
अशा कथा-कादंबऱ्या ते जेव्हा वाचतील
तेव्हा ते बाहेर पडतील आपल्या 'कोसला' तून
त्यांच्या मनातला 'पारवा' गाऊ लागेल,
तेव्हा त्यांचा 'प्रवासी पक्षी
स्वतःच्या आयुष्याची 'सनद' जाहीर करेल
'नक्षत्रांचे देणं' दिल्यासारखी.
त्यांच्या मनातला 'भटका पक्षी' बसू दे
पुस्तकांच्या ओळी-ओळींवर,
मग तेच 'अक्षर संगती'त गात राहतील
आयुष्यभर.
'परि तैसे हे नोहेचि देवा
देखिला अक्षरांचा मेळावा
आणि विस्मयाचिया जीवा
विस्मयो जाला!'
पुस्तकं हे सर्व शिकवतील त्यांना
पण त्याआधी पुस्तकं न्या तुम्ही त्यांच्यापर्यंत
किंवा त्यांना पुस्तकांपर्यंत.
खरंच, शिकवा त्यांना पुस्तकांचं महत्त्व
खरचं सांगतो सर, ती फारच
वाचन-उत्सुक गोड मुलं आहेत.

**प्रा. प्रदीप कर्णिक**
ग्रंथपाल, रुपारेल महाविद्यालय

हे मासिक प्रकाशक आणि संपादक श्री. अचलकुमार टिट्टू व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिंटस्, दुर्गावाडा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०२ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णुनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.